कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज

# शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय
# संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय

गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.



# । भावपूर्ण श्रध्दांजली ।



कै. डॉ. सुधाकर गोकाककर



कै. डॉ. डी.व्ही. तोगले



कै. प्रा. निरंजन खिचडी



कै. सदाशिवराव मंडलिक



कै. गोपीनाथ मुंडे



कै. आर.आर. पाटील



कै. गोविंदराव पानसरे



कै. विक्रमसिंह घाटगे



शहीद जवान
दूंरदूडी ऊर्फ रविद्रं कंकणवाडी

याचबरोबर समाजामध्ये सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रामध्ये भरीव असे काम केले आहे, परंतु ते आज या जगामध्ये अस्तित्वात नाहीत अशा सर्वांना शिवराज परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली !




# कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे



कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे जयंतीनिमित्त दीपप्रज्वलन करताना
संस्थेचे अध्यक्ष मा. किसनराव कुराडे व संस्थेचे पदाधिकारी



डॉ. अशोक भाईटे यांची शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरच्या
प्रभारी कुलगुरुपदी निवड झालेबद्दल त्यांचे अभिनंदन
करताना संस्थेचे अध्यक्ष मा. किसनराव कुराडे
व प्रबंधक श्री. संतोष शहापूरकर

## कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्थेचे
अध्यक्ष



# मा. किसनरावजी कुराडे



## प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे
**M.Sc. Ph.D.**



## प्रा. आर.बी. कांबळे एम.ए.बी.एड.

उपप्राचार्य, संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज



## प्रा. पी.एम. भोईटे एम.एस्सी.बी.एड.

पर्यवेक्षक, संभाजीराव माने कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज



## श्री. संतोष शहापूरकर एम.ए.

प्रबंधक, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज संचलित

शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय
आणि संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,
गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

# शिवराज २०१५

## संपादक मंडळ

प्रमुख संपादक



प्रा. अशोक मोरमारे

अध्यक्ष



प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे

## संपादन साहाय्य

विशेष साहाय्य



प्रा. अनिल कुराडे

मराठी विभाग



डॉ. ए. बी. कुंभार

हिंदी विभाग



डॉ. एस. बी. माने

इंग्रजी विभाग



प्रा. डी.यू. जाधव

विज्ञान विभाग



डॉ. एस. के. नेर्ले



डॉ. एम. पी. पाटील



प्रा. आर. डी. कमते

# आमचे वर्ग प्रतिनिधी व गुणवंत विद्यार्थी

विद्यार्थिनी प्रतिनिधी



स्नेहल लगळी

गुणी शिवराजीयन



रोहन तानाजी पाटील
बी.एस्सी. भाग २

गुणी शिवराजीयन



मेघा धोंडीराम जगताप
बी.एस्सी. भाग ३

विद्यापीठ प्रतिनिधी



अभिजीत पाटील

बी. ए. भाग १



सुभाष लक्ष्मण डोणेवाडी

बी. ए. भाग २



अशोक मधुकर पवार

बी.कॉम. भाग १



किशोरी रवींद्र शिंदे

बी. कॉम भाग २



निलम तुकाराम गोडसे

बी. कॉम भाग ३



बियामा बशीर वाटंगी

बी. एस्सी भाग २



निलम शिवूडकर

एम. कॉम. भाग १



अश्विनी मधुकर साठे

एम. कॉम. भाग २



विद्या श्रीकांत जामदार

बी. सी. ए. भाग १



अंकिता कुलकर्णी (विशेष प्राविण्य)

बी. सी. एस. भाग १



धनश्री जोतिराम अरडे

बी. सी. एस. भाग ३



प्रिया चिदानंद तेग्गीनमणी

बी. सी. एस. भाग ३



पौर्णिमा प्रभाकर पाटील

बी. बी. ए. भाग १



अनुराधा चन्नबसू कोटारी

बी. बी. ए. भाग ३



वैभव रामचंद्र इंगवले

एन. एस. एस. प्रतिनिधी



पुरुषोत्तम नामदेव सुतार

एन. सी. सी.



पवनकुमार दशरथ साठे

प्राचार्य नियुक्त



राजश्री जनार्दन शिंदे

प्राचार्य नियुक्त



रोशनी लक्ष्मण कांबळे

## संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज

११ वी सायन्स - अ



महेंद्र हेरेकर

१२ वी सायन्स - अ



राधिका रामचंद्र वडर

१२ वी आर्टस् - अ



सुलोचना दयानंद नाईक

१२ वी कॉमर्स



हिना बाबू अत्तार

# सेवानिवृत्ती



डॉ. आर.एन. कणसे



डॉ. सौ. एस.ए. मुजूमदार



प्रा. सौ. एस. वाय. कोले



प्रा. एस. बी. कडूकर



प्रा. एम. बी. पाटील



प्रा. बी.डी. पाटील

# संस्मरणिय यश

## अभिनंदन



**प्रा. किशोर अदाटे**
प्राणीशास्त्र विषयातील
लघुशोध प्रकल्प मंजूर



**प्रा. एन.बी. एकिले**
हिंदी विषयातील एम.फील.
पदवी प्राप्त व लघुशोध
प्रकल्प मंजूर



**प्रा. के.एस. देसाई**
व्यवस्थापन विषयातील
एम.फील. पदवी प्राप्त



**श्री. संतोष पाटील**
'सायमंड' या कथेला
राज्यस्तरीय गो.नी. दांडेकर
उत्तेजनार्थ पारितोषिक

# शिवराज साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

## स्थानिक व्यवस्थापन समिती

### (सन २०१४-१५ पासून)

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. के. व्ही. कुराडे | : अध्यक्ष |
| २) | मा. प्रा. जे. वाय. बारदेस्कर | : संस्था प्रतिनिधी |
| ३) | मा. श्री. आर. जी. येरटे | : विविध कार्यक्षेत्रातील प्रतिनिधी |
| ४) | मा. प्रा. के. बी. केसरकर | : विविध कार्यक्षेत्रातील प्रतिनिधी |
| ५) | मा. प्रा. व्ही. बी. कुरळे | : शिक्षक प्रतिनिधी |
| ६) | मा. प्रा. ए. व्ही. कुराडे | : शिक्षक प्रतिनिधी |
| ७) | मा. प्रा. सौ. एस.ए. मुजूमदार | : शिक्षक प्रतिनिधी (दि.३०/११/२०१४ पर्यंत) |
| ८) | मा. श्री. बी. एस. सावंत | : शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी (दि.३०/६/२०१५ पर्यंत) |
| ९) | मा. प्राचार्य, डॉ. एस. वाय. कोतमिरे | : सचिव |

# संभाजीराव माने साहित्य, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

## शाळा समिती

### (सन २०१४-१५ पासून)

| | | |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. के. व्ही. कुराडे | : अध्यक्ष |
| २) | मा. प्राचार्य बी. एम. चांडके | : संस्था प्रतिनिधी |
| ३) | मा. प्रा. जे. वाय. बारदेस्कर | : संस्था प्रतिनिधी |
| ४) | मा. प्रा. ए. व्ही. कुराडे | : संस्था प्रतिनिधी |
| ५) | मा. प्रा. आर. बी. कांबळे | : प्राध्यापक सदस्य |
| ६) | मा. श्री. एस. आर. शहापूरकर | : प्रशासक सेवक प्रतिनिधी |
| ७) | मा. प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे | : सचिव |

## दि प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक अॅक्ट नियम फॉर्म नं. ४ प्रमाणे निवेदन


| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : | शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) |
| **प्रकाशन काळ** | : | वार्षिक |
| **प्रकाशक** | : | **प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे** |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर – ४१६ ५०२. |
| **दूरध्वनी** | : | ०२३२७ – २२२३०७. |
| **संपादक** | : | **प्रा. ए. के. मोरमारे** |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर – ४१६ ५०२. |
| **दूरध्वनी** | : | ९४२१३८३६१०. |
| **मुद्रक** | : | **अतुल कोलते** |
| **राष्ट्रीयत्व** | : | भारतीय |
| **पत्ता** | : | श्री सरस्वती ऑफसेट, कडगांव रोड, गडहिंग्लज ४१६ ५०२. |
| **स्वामित्व** | : | शिवराज कला वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर – ४१६ ५०२. |


**मी प्राचार्य, डॉ. एस. वाय. कोतमिरे असे जाहीर करतो, की वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे सत्य आहे.**

**ह्या अंकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखनाची निवड, संपादन व मुद्रीत शोधन सहसंपादकांनी केले आहे.**

# मुखपृष्ठा विषयी....

एखादा प्राणी वाऱ्या पावसापासून आपले प्राण वाचविण्यासाठी आपले संपूर्ण शरीर दुमडून एखाद्या आडोशाला बसावे, त्याचप्रमाणे पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीण हे गाव आपले हातपाय दुमडून सह्याद्रीच्या कुशीत उद्याची नवी स्वप्ने मनामध्ये पाहून झोपी गेले होते. उद्याचा दिवस आपण आपल्या गावातील एका व्यक्तीचा दहावा घालायचा आहे. त्याची सर्व तयारी रात्रीच कशी करायची. भाताच्या रोपांची लावणी कोठे व किती करायची, कोणत्या शेतात पाणी अधिक आहे. हिरवा सण खाण्यासाठी आलेल्या माहेरवाशीनींना पुन्हा सासरी पाठवायचे, शाळकरी मुले उद्याचा अभ्यास करुन सकाळी लवकर शाळेत जायचे तर लावणीची कामे उरकलेली आहेत. म्हणून पुन्हा मुंबई पुण्याला आपल्या कामाच्या ठिकाणी निघून जायचे. या विचाराने झोपी गेले. दररोजच्या सारखा नवीन दिवस पाहण्यासाठी, दररोज नित्य नियमाप्रमाणे उगवणारा तेजस्वी सूर्य अनुभवण्यासाठी, पण नियतीने हा तेजस्वी सूर्य त्यांना पुन्हा पाहू दिला नाही. ३० जुलै २०१४ ची पहाट माळीण वासीयांवर एक काळ राक्षस होऊन बरसली. ज्याच्या कुशीमध्ये शेकडो वर्षापासून हे माळीणवासीय गुण्यागोविंदाने, मनसोक्तपणे जीवन जगत आले. आज तोच सह्याद्रीचा कडा त्यांच्यावर काळाच्या रुपाने कोसळला आणि संपूर्ण माळीण गाव दरडीखाली दबले गेले. काल या ठिकाणी गुण्यागोविंदाने जीवन जगणारा गाव आज अचानक कोठे गेले ? हा माळीणमध्ये दररोज सकाळी सात वाजता येणाऱ्या एसटी ड्रायव्हरचा झालेला भ्रम कालांतराने मूर्त रुप घेतो आणि या गावावर संपूर्ण डोंगर कोसळला आहे. त्यामुळे संपूर्ण गाव मातीखाली गाडला गेला आहे. याची जाणीव त्याला होते. एसटी ड्रायव्हरच्या सजगतेतून या घटनेची माहिती पोलीस, तहसिलदार, जिल्हाधिकारी व आजूबाजूच्या गावांना कळते आणि मदतीचा ओघ चालू होतो. मदत कार्य सुरु होते. गावाच्या अस्तित्वाची एक एक खूण बाहेर काढली जाते. १५३ जणांचा बळी या घटनेने घेतला होता. काहीचे संपूर्ण कुटुंबच उध्वस्त झाले होते तर काहींच्या कुटुंबातील एखादी व्यक्ती अपंग होऊन बाहेर येत होती. हा प्रसंग संपूर्ण महाराष्ट्राचेच नव्हे संपूर्ण जगाचे मन हेलावून टाकणारा होता. पण नियतीच्या मनात काय आहे ? याचा माणसाला मात्र शोध घेता आला नाही. यावेळी एक सुखद घटना घडली. ती म्हणजे निसर्गाच्या रुद्रावतरातही 'रुद्र' नावाचे सहा महिन्याचे बाळ व त्याची आई या भयानक प्रसंगातून सुखरुपपणे वाचते. दहा तास ढिगाऱ्याखाली असूनही हा चमत्कार घडला.

माळीणवासीयांच्या मदतीसाठी सरकारी पातळीवर, सामाजिक पताळीवर, खाजगी संस्थांकडून, विविध तऱ्हेची मदत मिळाली. आमच्या महाविद्यालयाकडून सामाजिक बांधिलकी म्हणून रु. २५,०००/- ची मदत दिली. पण जगाच्या नकाशावरील एक गाव एका क्षणात अचानक पुसले जावे आणि त्याची 'एक होतं माळीण' ही ओळख तयार व्हावी. ही घटना संपूर्ण महाराष्ट्र कधीच विसरु शकणार नाही. हा प्रसंग पावसाळा येताच प्रत्येकाच्या नजरेसमोर आल्याशिवाय राहणार नाही. परंतु या घटनेला 'शिवराज २०१५' या अंकाच्या मुखपृष्ठावर जागा देऊन या घटनेत जी माणसे वाचलेली आहेत त्यांना हे दु:ख पचविण्यासाठी, त्यांचे जगण्याचे बळ वाढविण्यासाठी निश्चत प्रेरणादायी ठरणार आहे.

**प्रा. अशोक मोरमारे**

प्रमुख संपादक



# संपादकीय....

शिवराज महाविद्यालयाचे अंतरंग उलगडून दाखविणारे व 'महाविद्यालयाचा आरसा' म्हणून वाचकांच्या मनामध्ये आदराचे स्थान निर्माण केलेले 'शिवराज २०१५' हे वार्षिक नियतकालिक आपणासमोर मांडताना मला मनस्वी आनंद होत आहे. सद्याच्या युगामध्ये आजचा युवक नवनवीन आव्हाने घेऊन जगताना दिसतो आहे. त्याच्यापुढे प्रश्नांचे डोंगरच्या डोंगर उभे राहिलेले आहेत. बेकारीसारखा एक मोठा प्रश्न घेऊन तो जीवनाला सामोरा जात आहे. त्यातच स्पर्धात्मक जीवनाचा त्याला अधिकाधिक सामना करावा लागत आहे. आजचा तरुण नेट, सेट, पीएच.डी., इंजिनिअर, डॉक्टर अशा विविध तऱ्हेच्या पदव्या घेऊन उच्चशिक्षित झाला आहे. असे असतानाही त्याला त्याच्या शिक्षणाकडून आपल्या पोटाची खळगी व्यवस्थित भरता येत नाही. त्यामुळे आजच्या तरुणांमध्ये असहायता, हतबलता निर्माण झाली आहे. त्यामुळे शिक्षणाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलायला लागला आहे. त्यातच समाजातील प्रत्येक आघाडीवर 'भ्रष्टाचारा'चे वाढलेले 'बांडगुळ' समाजवृक्षाला अधिकाधिक घट्ट चिकटत आहे. या सर्व गोष्टीचा परिणाम या तरुणाईवर तर अधिकच व्हायला लागला आहे. त्यातूनच त्याच्या मनामध्ये जीवनाबद्दल उदासिनता निर्माण झालेली दिसत असली तरी त्याने जीवनाकडे होकारात्मक दृष्टीनेच पाहिले पाहिजे. त्याच्यामध्ये ही जाणीव निर्माण करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. वाचन, चिंतन, मनन आणि लेखन चौसूत्रीच्या अवलंबनाने तो यशस्वी जीवन जगू शकतो. हा विचार रुजविण्याच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना लेखनाविषयी जाणीव करुन दिल्याने विद्यार्थी, लेखक व कवी निर्माण होत आहेत. त्यांचा हा लेखनाचा छंद अधिकाधिक वृद्धींगत व्हावा, त्याची समाज निरीक्षण क्षमता वाढीस लागावी, त्यांच्या विचारांना अधिकाधिक चालना मिळावी व त्यांची लेखनी अधिकाधिक सजग व्हावी. यासाठी 'शिवराज' नियतकालिक हे मोठे व्यासपीठ आहे. याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या विविध कथा,

कविता, वैचारिक लेख, व्यक्तिचित्रणे वाचकांपर्यंत पोहोचविण्याची चांगली संधी मला 'शिवराज २०१५' या वार्षिक नियतकालिकाच्या माध्यमातून मिळालेली आहे. या नियतकालिकासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्य संपदेसाठी विद्यार्थ्यांमध्ये आवाहन केले असता विद्यार्थी नव विचारवंतांनी जबरदस्त प्रतिसाद दिला. त्यांच्याकडून समाजपरिवर्तन व नवविचाराची पेरणी करणाऱ्या कथा, कविता, वैचारिक लेखन यांची भरपूर रेलचेल झाली. परंतु नियतकालिकाला नेमकेपणा यावा, यासाठी आलेल्या सर्वच साहित्य संपदेला नियतकालिकात सामावून घेता आले नाही. जे साहित्य नियतकालिकात सामावून घेता आले नाही, ते साहित्य समाज जागृती करु शकत नाही असे नाही. त्याच्यातही तेवढी ताकद आहेच. असे मी आवर्जून सांगतो.

'शिवराज २०१५' हे वार्षिक नियतकालिक पूर्णत्वास आणण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. किसनराव कुराडे, प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे, उपप्राचार्य प्रा.आर. बी. कांबळे, प्रा. अनिल कुराडे, सहसंपादक डॉ. आनंदा कुंभार, डॉ. एस. बी. माने, डॉ. एस. के. नेर्ले, प्रा. आर. डी. कमते, प्रा. डी. यु. जाधव, प्रबंधक श्री. संतोष शहापूरकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे वेळोवेळी सहकार्य लाभल्यामुळेच हे नियतकालिक लवकर पूर्ण करता आले. तसेच सरस्वती ऑफसेटचे मालक व त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांचे योगदानही अधिक मोलाचे आहे. या सर्वांचे मी आभार मानतो.

**प्रा. अशोक मोरमारे**
मुख्य संपादक

# शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ४० (६) व विधिनियम एस. (४४६) नुसार

महाविद्यालयाची स्टुडंट कॉन्सिल जाहीर करण्यात आली आहे.

स्टुडंट कौन्सिल २०१४ - २०१५

**प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे** : कार्याध्यक्ष, चेअरमन

**प्रा. ए. जी. हरदारे** : एन.एस.एस. सदस्य

**प्रा. आर. डी. मगदूम** : राष्ट्रीय छात्रसेना इनचार्ज शिक्षक, क्रीडा व शा. शिक्षण सदस्य

**प्रा. ए. बी. कुंभार** : सांस्कृतिक कार्यक्रम सदस्य

**श्री. संतोष शहापूरकर** : कार्यालय प्रमुख

### ✲ प्रतिनिधी आर्टस् ✲

| | |
|---|---|
| डोणेवाडी सुभाष लक्ष्मण | : बी. ए. भाग १ |
| पवार अशोक मधुकर | : बी. ए. भाग २ |
| कु. संकपाळ पूनम मारुती | : बी. ए. भाग ३ |
| कु. पाटील तृप्ती सुनिल | : एम. ए. भाग १ |
| कु. | : एम. ए. भाग २ |

### ✲ प्रतिनिधी कॉमर्स ✲

| | |
|---|---|
| कु. शिंदे किशोरी रविंद्र | : बी. कॉम. भाग १ |
| कु. गोडसे निलम तुकाराम | : बी. कॉम. भाग २ |
| कु. वाटंगी बियामा बशीर | : बी. कॉम. भाग ३ |
| कु. साठे अश्विनी मधुकर | : एम. कॉम. भाग १ |
| कु. जमादार विद्या श्रीकांत | : एम. कॉम. भाग २ |

### ✲ प्रतिनिधी सायन्स ✲

| | |
|---|---|
| कु. गवळी आरती शिवाजी | : बी.एस्सी. भाग १ |
| कु. फराकटे प्राजक्ता दादूराव | : बी. एस्सी. भाग २ |
| कु. शिऊडकर निमल बाळासोा | : बी. एस्सी. भाग ३ |

### ✲ प्रतिनिधी बी.सी.एस. ✲

| | |
|---|---|
| कु. आरडे धनश्री जोतीराम | : बी.सी.एस. भाग १ |
| कु. तेग्गीनमनी प्रिया चिदानंद | : बी.सी.एस. भाग २ |
| कु. पाटील पौर्णिमा प्रभाकर | : बी.सी.एस. भाग ३ |

### ✲ प्रतिनिधी बी.बी.ए. ✲

| | |
|---|---|
| कु. कोठारी अनुराधा चन्नबसु | : बी.बी.ए. भाग १ |
| कु. पताडे विजयमाला शिवाजी | : बी.बी.ए. भाग २ |
| इंगवले वैभव रामचंद्र | : बी.बी.ए. भाग ३ |

### ✲ प्रतिनिधी बी.सी.ए. ✲

| | |
|---|---|
| कु. कुलकर्णी अंकिता अरुण | : बी.सी.ए. भाग १ |
| कु. राणे मुयरी श्रीपती | : बी.सी.ए. भाग २ |
| | : बी.सी.ए. भाग ३ |

### ✲ प्राचार्य नियुक्त विभागवार प्रतिनिधी ✲

| | |
|---|---|
| सुतार पुरुषोत्तम नामदेव | : राष्ट्रीय सेवा योजना |
| साठे पवनकुमार दशरथ | : राष्ट्रीय छात्र सेना |
| कु. लगळी स्नेहल वीरपाक्ष | : क्रीडा विभाग |
| पाटील अभिजित मलगोंडराव | : सांस्कृतिक कार्यक्रम |
| कु. कांबळे रोशनी लक्ष्मण | : विद्यार्थिनी प्रतिनिधी |
| कु. शिंदे राजश्री जनार्दन | : विद्यार्थिनी प्रतिनिधी |

# संभाजीराव माने कला, वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, गड.

वर्गप्रतिनिधी २०१४-२०१५

### ✲ प्रतिनिधी आर्टस् ✲

| | |
|---|---|
| कु. चौगुले उषा बाबुराव | : ११ वी आर्टस् अ |
| म्हाबरजी समीर गुलाब | : ११ वी आर्टस् ब |
| कु. नाईक सुलोचना दयानंद | : १२ वी आर्टस अ |
| हणमंते सौदागर तुकाराम | : १२ वी आर्टस ब |

### ✲ प्रतिनिधी कॉमर्स ✲

| | |
|---|---|
| कु. मांडेकर कोमल मधुकर | : ११ वी संयुक्त क |
| चौगुले अक्षय धोंडिबा | : ११वी संयुक्त |
| कु. अत्तार हिना बाबु | : १२ वी संयुक्त क |

### ✲ प्रतिनिधी सायन्स ✲

| | |
|---|---|
| हेरेकर महेंद्र मल्हारी | : ११ वी सायन्स अ |
| उत्तुरे सुशांत सुनिल | : ११ वी सायन्स ब |
| केसरकर अक्षय आनंदा | : ११ वी सायन्स क |
| कु. वडर राधिका रामचंद्र | : १२ वी सायन्स अ |
| कु. गंधवाले नीलेश अनंत | : १२ वी सायन्स ब |
| कु. पाटील मेघा राजेश | : १२ वी सायन्स क |

# महाविद्यालयातील विशेष/नाविण्यपूर्ण कार्यक्रम



नॅक पिअर टीमचे स्वागत करताना संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. किसनराव कुराडे




नॅक पिअर टीम चेअरमन डॉ. सतिंदर सिंह महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना



नॅक पिअर टीम महाविद्यालयातील प्राध्यापकांसमवेत



नॅक पिअर टीम महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचाऱ्यांसमवेत




कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेवेळी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस



कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेवेळी विजेत्यांना चषक प्रदान करताना संस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. किसनराव कुराडे, आर. के. वांद्रे



'महाराष्ट्रातील' पेटते पाणी या विषयावर मार्गदर्शन करताना मा. राजेंद्र गड्याण्णावर



'युवकांसमोरील आव्हाने' याविषयावर मार्गदर्शन करतांना न्यायाधीश कोळसे-पाटील

# महाविद्यालयातील विविध समितींमार्फत राबविलेले कार्यक्रम




बी.सी.एस.३ निरोप समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. जे.वाय. बारदेस्कर




कॅम्पस इंन्टरव्ह्यूवमधून निवड झालेबद्दल कु. तेजश्री भुईंबर हिचा सत्कार करताना डॉ. कामत



बी.कॉम. ३ निरोप समारंभप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. अनिल कुराडे



जागतिक महिला दिनानिमित्त मार्गदर्शन करताना सौ. क्रांतिदेवी कुराडे



असा साजरा झाला...विना वाहन दिवस !




पालक मेळाव्यात मार्गदर्शन करताना उपप्राचार्य प्रा. आर.बी. कांबळे



'आय.पी.एस. पर्यंतची वाटचाल' या विषयावर मार्गदर्शन करताना डी.वाय.एस.पी. नीलेश सोनावणे



युवा महोत्सव २०१४-१५ मध्ये तृतीय क्रमांक मिळवलेले लोकनृत्य

# महाविद्यालयातील विविध समितींमार्फत राबविलेले कार्यक्रम



इंग्लिश विभागातील विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. पी.ए. आत्तार



इंग्लिश विभागातील विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. डी.आर. मोरे



'मानवी हक्क आणि विद्यार्थी' या विषयावर मार्गदर्शन करताना ॲड. दिग्विजय कुराडे



'सोशल मीडिया आणि विद्यार्थी' या कार्यशाळेत डॉ. ओमप्रकाश कलमे मार्गदर्शन करताना



स्पर्धा परीक्षा संदर्भात मार्गदर्शन करताना डॉ. सागर पाटील



'सोशल मीडिया आणि विद्यार्थी' या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. एस. डी. पाटील



पी.एस.आय. पदी निवड झाल्याबद्दल कु. अश्विनी कोंडसकरचा सत्कार करताना सौ. दळवी



'सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. अजय शिंदे

# वार्षिक स्नेह संमेलन
# विविध गुणदर्शन



शिवराज महोत्सव उद्घाटन करताना श्री. बाबासाहेब पाटील व श्रीरंग चागुले



शिवराज महोत्सवात अहवाल वाचन करताना प्राचार्य. डॉ. एस.वाय. कोतमिरे



स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. आर.डी. कमते मार्गदर्शन करताना



स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख अतिथी कर्नल पी.सी. पवार मार्गदर्शन करताना



पारितोषिक वितरण करताना संस्थेचे अध्यक्ष मा. किसनराव कुराडे



पारितोषिक वितरण करताना प्रमुख अतिथी कर्नल पी.सी. पवार



शिवराज महोत्सवात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ समाजसेवक प्रा. विठ्ठल बन्ने



भित्तीपत्रक उद्घाटन करताना श्री. आर. के. वांद्रे

# वार्षिक स्नेह संमेलन
# विविध गुणदर्शन




शिवराज महोत्सवात गीत सादर करताना कलाकार




शिवराज महोत्सवात
नृत्याविष्कार






शिवराज महोत्सवात नृत्य व गीत सादर करताना कलाकार



'शिवराज श्री' विजय नांदवडेकर

# क्रीडा विभाग
# धवल यश


पुणे ॲम्युचर ॲथलेटीक्स स्पर्धेतील खेळाडू व मान्यवर


स्नेहल लगळी


शिवाजी विद्यापीठ झोनल महिला क्रिकेट टीमसह (रनरअप) मान्यवर


दर्शन ट्रॉफी, बेळगाव - रनर अप टीमसह प्राध्यापक वृंद


ऐश्वर्या सु. कदम


शिवाजी विद्यापीठ जनरल चॅम्पीयनशीप (हॅट्रीक) मिळवलेल्या टीमसह मान्यवर

## राष्ट्रीय खेळाडू


नितीन कोळी
तलवारबाजी


साईकिशन नाईक
क्रॉसकंट्री


श्रेयस कुराडे
तलवारबाजी


सचिन कदम
हॉकी


शिल्पा कुरळे
फुटबॉल


मालू शेंडे
फुटबॉल


पद्मा राठोड
खो-खो


आश्विनी कुरळे
हॉकी


पूजा शिंदे
उंचउडी


हर्षाली शेवाळे
फुटबॉल


गिरिजा लोहार
हॉकी


अमृता वडाप
ॲथलेटिक


कावेरी चव्हाण
हॉकी


साधना करडे
राज्यस्तरीय - क्रॉसकंट्री


राहूल गुंठे
राज्यस्तरीय - ॲथलेटिक


अतुल पाटील
राज्यस्तरीय - ॲथलेटीक


विजय नांदवडेकर
राज्यस्तरीय - शरीरसौष्ठव

# क्रीडा विभाग धवल यश



प्रा. जयवंत पाटील
क्रीडा विभाग प्रमुख



आरती पाटील १२ वी कला
राष्ट्रीय ॲथलेटीक खेळाडू



नम्रता दंडगीदास
ॲथलेटीक



ऋतूजा मगदूम
ॲथलेटीक



नम्रता सुतार
१२ वी सायन्स
सायकलींग



सारिका चिटणीस
१२ वी कला
ॲथलेटीक



अमोल जाधव
१२ वी कॉमर्स
ॲथलेटीक



साईनाथ कोंडुस्कर
१२ वी सायन्स
ॲथलेटीक



राजू गाडीवड्डर
१२ वी कला
क्रॉस कंट्री



विकास चौगुले
१२ वी कला
ॲथलेटीक



ऋषिकेष सुतार
११ वी सायन्स
ॲथलेटीक



आकाश कडूकर
१२ वी कला
ॲथलेटीक



पवन कोकितकर
१२ वी कला
ॲथलेटीक

# राष्ट्रीय छात्र सेना
## (N.C.C.)

SUO



रोहित जाधव
Tsc-Gold Medal

JUO



सुविदास हजारे
Pre-TSC

JUO



राहूल गुंठे
Sport Camp



**प्रा. आर. डी. मगदूम**
प्रमुख : राष्ट्रीय छात्र सेना

CSM



पवनकुमार साठे
Army Attachment Camp

CPL



एकनाथ शिंदे
Army Attachment Camp

CPL



अमर मिसाळ
Army Attachment Camp

CDT



सतीश कानडे
Army Attachment Camp

CDT



किर्तीकुमार नवकुडकर
NIC NOVADA, DELHI



मान्यवरांसमवेत एन.सी.सी. छात्र



विना वाहन दिवस १४ नोव्हेंबर



क्रांतीदिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात सहभागी एन.सी.सी. छात्र



प्रजासत्ताकदिनी मान्यवरांना मानवंदना देताना एन.सी.सी. छात्र

# शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद

## वनस्पतीशास्त्र विभाग

प्रा. डॉ. एस. वाय. कोतमिरे (एम्. एस्सी., पीएच्.डी.)
प्रा. जे. व्ही. सरतापे (एम्. एस्सी.)
प्रा. डॉ. एस्. के. नेर्ले (एम्. एस्सी., पीएच्.डी.)
प्रा. व्ही. आर. देसाई (एम्. एस्सी.)
प्रा. व्ही. वाय. पाटील (एम्. एस्सी.)

## मराठी विभाग

प्रा. एस्. सी. जोशी (एम्. ए., डी.एच.ई., डी.ए.ई.)
प्रा. डॉ. एम्. व्ही. राजे (एम्. ए., पीएच्.डी.नेट)
प्रा. डॉ. ए. बी. कुंभार (एम्. ए., पीएच्.डी.नेट)
प्रा. ए. के. मोरमारे (एम्. ए., नेट)
प्रा. एस. एस. पाटील (एम्. ए.)

## इंग्रजी विभाग

प्रा. डॉ. एन्. आर. सावंत (एम्.ए., एम्.फिल्.पीएच्.डी.)
प्रा. सौ. एस्. ए. मुजुमदार (एम्. ए., पी.जी.डी.ई.) (३०/११/२०१४ पर्यंत)
प्रा. डी. यु. जाधव (एम्. ए., नेट)
प्रा. पी. ए. पाटील (एम्. ए., सेट)
प्रा. पी. एस. होनगेकर (एम्. ए.बी.एड्., एम.एड्., पी.जी.सी.टी.ई.)

## हिंदी विभाग

प्रा. एन. बी. एकिले (एम्. ए., एम.फील. नेट)
प्रा. डॉ. एस. बी. माने (एम्. ए., पीएच्.डी.)

## मानसशास्त्र विभाग

प्रा. आर. व्ही. गुंडे (एम्. ए., एम्.फिल.)

## समाजशास्त्र विभाग

प्रा. ए. व्ही. कुराडे (एम्. ए.)
प्रा. एस्. डी. सावंत (एम्. ए., एम्. फिल., नेट) २१/२/२०१३ FIP
प्रा. आर. पी. हेंडगे (एम्. ए., एम्. फिल., नेट)
प्रा. डी. टी. आचार्य (एम्. ए., एम्. फिल., नेट) २१/२/२०१३ पासून
प्रा. एस. पी. पाटील (एम्. ए., बी.एड.)

## राज्यशास्त्र विभाग

प्रा. एन्. आर. कोल्हापूरे (एम्. ए., एम्. फिल., सेट)
प्रा. डॉ. ए. जी. हारदारे (एम्. ए., एम्. फिल्., पीएच.डी., नेट)

## अर्थशास्त्र विभाग

प्रा. डॉ. डी. आर. खटके (एम्. ए., एम्.फिल.पीएच.डी.)
प्रा. जी. जी. गायकवाड (एम्. ए., बी.लिब., नेट)
प्रा. एस. जी. मुंज (एम्.ए.)
प्रा. टी. डी. भांदुगरे (एम्.ए., बी.एड.)
प्रा. ए. यु. पटेल (एम्.ए., बी.एड.)

## वाणिज्य विभाग

प्रा. डॉ. आर. बी. तेली (एम्.कॉम., एम्. फिल्.पीएच्.डी.)
प्रा. डी. पी. कांबळे (एम.कॉम., सेट)
डॉ. एम. डी. चौगुले (एम.कॉम., एम्.फिल., पीएच.डी.)
प्रा. ए. व्ही. पाटील (एम.कॉम., बी.एड.)

## भौतिकशास्त्र विभाग

प्रा. डॉ. एस. ए. जोडगुद्री (एम्.एस्सी., एम्फिल.पीएच. डी.)
प्रा. डॉ. बी. डी. मुरगी (एम्. एस्सी., पीएच.डी.)
प्रा. डॉ. एम्. पी. पाटील (एम्. एस्सी., डी.एच.ई., पीएच.डी.)
प्रा.बी. एम्. कुलकर्णी (एम्. एस्सी., एम्.फिल.)
प्रा. डॉ. एस्. एम्. कदम (एम्. एस्सी., पीएच.डी.)
प्रा. डॉ. पी. एस्. चिगरे (एम्. एस्सी., डी.एच.ई., पीएच.डी.)
प्रा. ए. ए. पाटील (एम्. एस्सी.)
प्रा. आर. एन. कोकीतकर (एम्. एस्सी.)
प्रा. डी. ए. डावरे (एम्. एस्सी.)

## संख्याशास्त्र विभाग

प्रा. डी. एम्. म्हेतर (एम्.एस्सी., एम्.फिल.)
प्रा. आर. के. देशपांडे (एम्.एस्सी.)
प्रा. सौ. एम्. आर. दंडगे (एम्.एस्सी.)
प्रा. जे. के. पाटील (एम्.एस्सी.)

# संभाजीराव माने कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा प्राध्यापक वृंद (अनुदानित विभाग)

## मराठी विभाग
प्रा. व्ही. एस्. मुसाई (एम्. ए.,बी.एड्.,एम.फील.)
प्रा. टी. व्ही. चौगुले (एम्. ए., बी.एड्.)

## इंग्रजी विभाग
प्रा. आर. बी. कांबळे (एम्. ए., बी.एड्., डी.एच्.ई.)
प्रा. के. ए. सावेकर (एम्. ए., डी.एच्.ई.)
प्रा. आय. डी. नेर्लेकर (एम्. ए.,बी. एड्.)

## हिंदी विभाग
प्रा. सौ. एल्. एम्. डिसोझा (एम्. ए., बी.एड्.)

## समाजशास्त्र विभाग
प्रा. एस. पी. पाटील (एम्. ए., बी.एड्.)

## अर्थशास्त्र विभाग
प्रा. सौ. एन. पी. शिंदे (एम्. कॉम.,एम.ए.,बी.एड्.)

## राज्यशास्त्र विभाग
प्रा. आर. एस. सरनाईक (एम्. ए., बी.एड्.)

## मानसशास्त्र विभाग
प्रा. ई. जी. कांबळे (एम्. ए., बी.एड्.)
प्रा. एम्. एस्. घस्ती (एम्. ए., बी.एड्.)

## पर्यावरणशास्त्र विभाग
प्रा. सौ. एस. पी. गाडवी

## वाणिज्य विभाग
प्रा. ए. व्ही. पाटील (एम.कॉम.,बी.एड.)

## पदार्थ विज्ञान विभाग
प्रा. बी. डी. पाटील (एम्. एस्सी., डी.एच्.ई.) (२८/२/२०१५ पर्यंत)
प्रा. ए. बी. कोकणे (एम्. एस्सी.,बी. एड्.)

## रसायनशास्त्र विभाग
प्रा. पी. एम्. भोईटे (एम्. एस्सी., डी.एच्.ई.)
प्रा. एस्. एच्. रावण (एम्. एस्सी., बी.एड्.)
प्रा. सौ. आर. के. अदाटे (एम्. एस्सी., बी.एड्.)
प्रा. कु. एम. एम. देसाई (एम्. एस्सी., बी.एड्.)

## जीवशास्त्र विभाग
प्रा. पी. टी. कट्टी (एम्. एस्सी., डी.एच्.ई.)
प्रा. कु. पी. आर. जाधव (एम्. एस्सी.)
प्रा. व्ही. वाय. पाटील (एम्. एस्सी.,बी.एड.)
प्रा. कु. पी. एम. कडाकणे (एम्. एस्सी., बी.एड्.)

## गणित विभाग
प्रा. एन्. एम्. गरुड (एम्. एस्सी., डी.एच्.ई.)
प्रा. सी. एस. रुडगी (बी.ई.,एम.बी.ए.)

## शारीरिक शिक्षण विभाग
प्रा. जयवंत पाटील (एम्. ए., एम्.पी.एड्.)

## आय. टी. विभाग
प्रा. एस. पी. कुराडे (एम.एस.ई. कॉम्प्यू.)
प्रा. ए. एस. कांबळे
प्रा. यु. पी. कानडे

# महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी वृंद

## कार्यालय

■ प्रबंधक

श्री. एस. आर. शहापूरकर (बी. ए.)

■ अधीक्षक

श्री. बी. एस. सावंत (बी. ए.)

■ कनिष्ठ लघुलेखक

श्री. के. टी. कुंभार (बी. कॉम.)

■ कनिष्ठ लेखनिक

श्री. एम. बी. माने (बी. कॉम्., एम्. लिब.)
श्री. पी. डी. पाटील (बी. कॉम्.)
श्री. ए. एम्. पोवार (बी. कॉम्., एम्. लिब.)
श्री. एन्. एस्. काबळे (बी. ए., एम्. लिब.)
श्री. एन. झेड. दळवी (बी. कॉम्.)
श्री. बी. बी. जाधव (बी.ए.)
श्री. पी. डी. सोरप (बी. ए.)

## ग्रंथालय

■ ग्रंथपाल

प्रा. एस. आर. कुराडे (बी.एस्सी., एम.लिब सेट)

■ साहाय्यक ग्रंथपाल

श्री. आर. ए. जाधव (एम्. ए., एम्. लिब., एफ.फिल.)

■ ग्रंथालय लेखनिक

श्री. बी. एल. कोरवी (बी. ए.)

■ ग्रंथालय परिचर

श्री. एस्. एस्. हजारे
श्री. व्ही. आर. टेंबरे
श्री. पी. बी. नडगेरी
श्री. ए. एल्. कलकुटकी (एम. ए.)
श्री. ए. एस. सावंत
श्री. एन. बी. असोदे
श्री. एम. बी. शिंदे

■ प्रयोगशाळा साहाय्यक

श्री. डी. जी. रेंदाळे (बी.ए.)
श्री. आर. बी. आयरनाईक (एम्.ए.)
श्री. पी. जी. पोवार (एम्.ए.)
श्री. एस्. व्ही. शिंदे (बी.एस्सी., बी.लीब.सायन्स)

■ प्रयोगशाळा परिचर

श्री. बी. डी. मोरे
श्री. एस्. बी. खोत (बी. कॉम्.)
श्री. एस्. डी. पाटील
श्री. टी. आर. देवडकर
श्री. व्ही. व्ही. कोंडूसकर
श्री. एम्. जी. खोत (बी. ए.)
श्री. टी. बी. कांबळे
श्री. आर. के. वडर
श्री. एस्. एम्. मोरबाळे
श्री. के. आर. कांबळे
श्री. एस्. एम्. कांबळे
श्री. व्ही. बी. पाटील
श्री. डी. जी. हुंदळेकर (बी. कॉम्.)
श्री. एस. एस. कांबळे
श्री. एस. एन. पाटील (एम.ए., एम.बी.ए.)

■ शिपाई

श्री. एस्. डी. कुरळे
श्री. यु. डी. राऊत
श्री. एम. के. गोटुरे
श्री. व्ही. ए. सुतार
श्री. ए. एच. नाईक
श्री. व्ही. एस. गुरव
श्री. के. एम. सूर्यवंशी
श्री. एस. जी. हिले

## प्राध्यापकवृंद (विना अनुदान विभाग)

### ■ बी.बी.ए.

प्रा. आर. डी. कमते (एम.बी.ए.,एम.फिल.)

प्रा. प्रा. ए. यू. पटेल (एम.ए.,एम.फिल.)

प्रा. जी. ए. पाटील (एम.कॉम.,एम.बी.ए.,जी.डी.सी.ए.)

प्रा. एस. बी. शिंदे (एल.एल.बी.)

प्रा. यु. एस. पाटील (एम.सी.एम.)

प्रा. पी. एस. पाटील (एम.बी.ए.)

प्रा. एस. एम. बेल्लद (एम.बी.ए.)

प्रा. एस. पी. गाडवी (एम.एस्सी. इन.)

### ■ बी.सी.ए.

प्रा. के. एस. देसाई (बी.एस्सी.,एम.बी.ए.,जी.डी.सी.ए.,नेट)

प्रा. डी. एस. पठाण (एम.सी.ए.)

प्रा. ए. एस. कांबळे (एम.एस्सी.,कॉम्प्यु.)

प्रा. कु. एन. एन. होडगे (एम.एस्सी. कॉम्प्यु.)

प्रा. ए. टी. महाडीक (बी.ई.(आयटी.))

प्रा. एस. एस. देसाई (एम.एस्सी.इन.)

प्रा. एन. बी. देसाई (बी.ई.(आयटी.))

### ■ बी.सी.एस.

प्रा. सी. एस. निकम (एम.सी.ए.)

प्रा. सौ. एम. आर. दंडगे (एम.एस्सी.)

प्रा. एन. जी. चव्हाण (एम.एस्सी.इले.)

प्रा. आर. के. पाटील (एम.एस्सी.कॉम्प्यू.)

प्रा. सौ. पी. एस. वाली (एम.एस्सी., बी.एड्.)

प्रा. आर. बी. खोत (एम.एस्सी., कॉम्प्यु.)

प्रा. डी. एस. खांडेकर (एम.एस्सी.कॉम्प्यु.)

प्रा. सौ. व्ही. पी. कळसगोंडा (एम.एस.सी. कॉम्प्यु.)

प्रा. आय. पी. सुतार (एम.सी.एम.)

### ■ एम.सी.ए.

प्रा. व्ही. व्ही. आजरी (एम.सी.ए.)

## प्रशासकीय कर्मचारी वृंद (विना अनुदान विभाग)

■ **वरिष्ठ लेखनिक**-श्री.पी.ए.शेंडे (बी.एस्सी.,एम.बी.ए.)

■ **कनिष्ठ लेखनिक**

श्री. एस. ए. शिरहट्टी (बी.कॉम्.)

सौ. एस. बी. निकम (बी.कॉम.)

श्री. एन. टी. पाटील (बी.कॉम्.)

श्री. डी. बी. देसाई (बी.कॉम्.)

सौ. एस. बी. आजरी (बी.कॉम्.)

श्री. व्ही. एम. घेज्जी (बी.ए.)

श्री. वाय. एस. शेंडे (एम.ए.)

श्री. सी. आय. बाबर (एम.ए.)

सौ. पी. आर. सलवादे (बी.ए.)

■ **ग्रंथपाल** - श्रीमती जी. जे. शिंदे (बी.लिब्.)

■ **ग्रंथालय परिचर** - श्री. ए. जी. भाटले (एम.ए.)

■ **लॅब असिस्टंट** - श्री. वाय. बी. पाटील (एम.सी.ए.)
श्री. एम. एस. स्वामी (डी.,इ.एन.टी.सी.)

■ **लॅब अटेंडंट** - श्री. बी. जी. चौगुले (बी.ए.)
श्री. डी. के. पताडे (१२ वी)

■ **इलेक्ट्रिशियन** - श्री. आय. बी. गोवेस

■ **टेक्निशियन**

श्री. आर. एन. कांबळे (बी.ए.) (हार्डवेअर अँड नेटवर्कींग)

श्री. एस. एस. जाधव (हार्डवेअर)

■ **झेरॉक्स ऑपरेटर** - श्री. जी. डी. निढोरी

■ **सिक्युरिटी गार्ड**

श्री. डी. एम. पोवार    श्री. सी. आय. जोशीलकर

■ **माळी** - श्री. के. के. सागर

■ **शिपाई**

श्री. एस. टी. हजारे    श्री. डी. एस. पाटील

श्री. एम. बी. यादव    श्री. एस. एस. गवळी (बी.ए.)

श्री. एम. बी. रेडेकर    श्री. एस. जे. साबळे

श्री. एस. व्ही. पाटील    श्री. एस. एस. कांबळे

■ **सफाई कामगार** - सौ. एस. एस. थाबे

## कर्मवीर वि. रा. शिंदे शिक्षण संस्था (प्रशासकीय कर्मचारी वृंद)

■ **प्रशासकीय प्रमुख** - श्री. एल. एस. शिंदे (बी.कॉम.), लेखनिक - श्री. नारायण पाटील (बी.कॉम.)

# मराठी विभाग



"ह्या विश्वभानाच्या घोंघावत्या समुद्रफेसात निरर्थक न ठरो
आपल्या आयुष्याच्या सुरम्य सप्तरंगी बुडबुडा, न ढळो
हे पहाटी पांघरलेले दाट झाडांतून डोकावणारे रोशन सूर्य

ह्या खिन्न विनाशतत्त्वाच्या झपाट्यात दरवळो
अकाली महामेघानं उठवलेली जमिनीतली उग्रगंधी धूळ, साचो
घर भरून जगण्याची समृद्ध अडगळ"

**- भालचंद्र नेमाडे**

ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिक

सहसंपादक

**डॉ. ए. बी. कुंभार**

मराठी विभाग

# अनुक्रमणिका

## * गद्य विभाग *


- मराठी साहित्यातील दैदिप्यमान तारा : डॉ. भालचंद्र नेवाडे — कु. जयश्री मारुती पाटील
- वंशाचा दिवा पाहिजे — किरण बळवंत गोडसे
- मी मराठी — कु. स्नेहलता दत्ताद्धत्रय यळूरकर
- लक्षात नसलेला बाप — संकलन – बाळकृष्ण बाळू परीट
- माझी बोली मालवणी — अमन अजय चव्हाण
- अथांग — भाग्यश्री शिवाजीराव देसाई
- आजच्या तरुण पिढीपुढील आव्हाने — अजित रघुनाथ पाटील
- पैसा — समिता चंद्रकांत नौकुडकर
- आकांक्षापुढती गगन ठेंगणे — आरती सखाराम कासारकर
- इंदिरा गांधी — भाग्यश्री शिवाजीराव देसाई
- बाबा आमटे — धनश्री अरविंद देसाई
- मराठीच्या ऱ्हासाला जबाबदार कोण? — प्रभाकर राजाराम पवार


## * पद्य विभाग *


| | | | |
|---|---|---|---|
| • आई, मला जन्म घेऊ दे! | कु. वैष्णवी जोशी | • कर्तृत्व | स्नेहलता यळूरकर |
| • सकाळ | प्रवीण यादव | • आयुष्याच्या संध्याकाळी | विजया देशपांडे |
| • खरंच असं जगा | प्रवीण यादव | • बाप | सुमित रांगणेकर |
| • देखावा | नयना पाटील | • हवीहवीशी लेक | मोनिका सुतार |
| • प्रेम म्हणजे...? | अमिता सरनोबत | • पैसा | स्वप्नाली कोरे |
| • ओळख | विशाल कुरळे | • पहिला पाऊस | विकास मोरे |
| • स्वप्न | संतोष चव्हाण | • आठवण | हेळवाडकर मधुकर |
| • जीवन | ज्योती देसाई | • आई | कल्लाप्पा फुलगोंडे |
| • बाबा | स्वाती लोंढे | • रक्तदान | अश्विनी भालेकर |
| • बॅनर | समिता नौकुडकर | • माझं प्रेम | किरण गोडसे |


## * इतर *

कु.

# मराठी साहित्यातील दैदिप्यमान तारा : डॉ. भालचंद्र नेवाडे

✍..... कु. जयश्री मारुती पाटील (एम.ए..भाग-१)

" परंपरा ही शूर वीरांची,
नररत्नांची खाण,
इथे जन्मले राजे–योद्धे ,
मुत्सद्दी विद्वान."

भालचंद्र नेमाडेंचा जन्म सह्यद्रीच्या दऱ्याखोऱ्यात हिरव्यागार वनराईने नटलेल्या जळगाव जिल्ह्यतील यावल तालुक्यातील सांगवी या गावात झाला. मराठी साहित्य शारदेच्या मंदिरातील एक पूजक,देशी भाषेवर नितांत प्रेम करणारा भक्त आणि आपल्या क्रांतीकारी विचारांनी अवघ्या साहित्य क्षेत्राला खडबडून जागा करणारा लेखक प्रा. भालचंद्र नेमाडे यांना साहित्यातील सर्वोच्च मानाचा सन्मान जाहीर झाला. तो सन्मान म्हणजे " ज्ञानपीठ पुरस्कार" होय.आपल्या सडेतोड लेखणीने मराठी साहित्यात स्वतंत्र स्थान निर्माण करणारा एक विचारवंत, तत्त्वज्ञ, लेखक, कवी, कादंबरींकार अशी ओळख त्यांनी मराठी साहित्य विश्वाला करून दिली.

प्रतिभा संपन्न लेखन शैलीने मराठी साहित्यात आपला सतंत्र 'पंथ' निर्माण करणारे ज्येष्ठ साहित्यिक,समीक्षक,कवी भालचंद्र नेमाडे यांना साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाला.मराठी साहित्यामध्ये दिलेल्या अमूल्य योगदानाबद्धल त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले.साहित्यातील सर्वोच्च बहूमान मिळवणारे मराठीतील चौथे साहित्यिक म्हणजे भालचंद्र नेमाडे होय. वि.स.खांडेकर,वि.वा.शिरवाडकर,विं.दा.करंदीकर यांच्यानंतर ज्ञानपीठ पुरस्कार लाभलेले ते चौथे मराठी साहित्यिक ठरले आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळणयाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असताना नेमाडे यांना मिळालेल्या सर्वोच्च साहित्य पुरस्काराने मराठी भाषिकांना भारावून टाकले.

ऐन पंचविशीत असताना 'कोसला' ही कादंबरी लिहून त्यांनी मराठी साहित्याला जबरदस्त धक्का दिला आणि त्यांनी मराठी साहित्य शारदेच्या गाभाऱ्यात प्रवेश केला. कोसला कादंबरी प्रसिद्ध झाली आणि मराठी साहित्य,समीक्षा क्षेत्रात जबरदस्त खळबळ उडाली. कोसला कादंबरीने तत्कालीन 'प्रस्थापित' व 'प्रमाण' मराठी भाषेतील लेखनाला धक्का दिला.गेली ५० वर्षे या कादंबरीचे गारूड मराठी मनावर टिकून राहिले आहे. आजही मराठीतील लोकप्रिय कादंबऱ्यांमध्ये 'कोसला' अग्रस्थानी आहे.

नेमाडेंनी कादंबरी, कविता, समीक्षा अशा सर्व क्षेत्रात ग्रंथ निर्मिती केली. विविध विद्यापीठांमध्ये इंग्रजीचे अध्यापन केले. नेमाडे 'वाचा' या अनियतकालिकाचे संपादकही होते. रंजनवादी मूल्यांना कडाडून विरोध करतानाच परंपरेविषयी चिकित्सक असण्याकडे त्यांचा कल आहे. मराठीवरील इंग्रजी साहित्याचा प्रभाव, शास्त्रीय दृष्टीने अभ्यास ही वैशिष्ट्ये असणाऱ्या नेमाडेंनी इंग्रजीतूनही साहित्य निर्मिती केली. 'साहित्याची भाषा' हे त्यांचे भाषाविषयक तात्विक स्वरूपाचे पुस्तक वाचकांना वेगळी दृष्टी देते.

खानदेशातील डोंगर सांगावीत १९३८ मध्ये जन्मलेले नेमाडे यांनी भालोद येथे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेतले.पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयातून १९६१ मध्ये बी.ए. ची पदवी घेतली,आणि त्यानंतर डेक्कन महाविद्यालयातून 'लिंग्विस्टिक्स' मध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले. मुंबई विद्यापीठातून त्यांनी १९६४ मध्ये इंग्रजी साहित्यातील पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. तर मराठवाडा विद्यापीठात पी.एचडी. मिळविली.जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने त्यांना सन्माननीय डी.लिट. ने गौरविले.नेमाडे

यांनी विद्यापीठ स्तरावर मराठी आणि इंग्रजी हे विषय तसेच तुलनात्मक साहित्य यांचे अध्यापन केले.गोवा विद्यापीठात ते इंग्रजीचे विभागप्रमुख होते.

भालचंद्र नेमाडे म्हणजे साहित्यातील वादळी व्यक्तिमत्त्व.त्यांना वादळी म्हणण्याचे कारण म्हणजे त्यांचा साहित्यिक झपाटा. त्यांचे साहित्य वाचकांचे मन भारावून टाकते. कॉलेज जीवन जगत असतानाच त्यांनी साहित्य शारदेच्या मंदिरात प्रवेश केला आणि त्यांच्या काव्यप्रतिभेला अंकुर फुटला. त्यांच्या साहित्याचा रथ जरी कादंबरीने सजला असला तरी त्यांच्या त्या रथावर काव्याचा ध्वज डौलाने फडकू लागला. त्यांच्यातला लेखक,कवी समृद्ध होत गेला. 'छंद', 'अथर्व', 'रहस्यरंजन' प्रतिष्ठान यासारख्या नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या. 'मेलडी' हा त्यांचा पहिलावहिला कवितासंग्रह.

## नेमाडेंसाठी कविताच सर्वात 'देखणी'

डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी प्रामुख्याने कादंबरी लेखन केले असले तरी त्यांच्या साहित्याच्या रथावरील ध्वज काव्याचाच आहे. कविता हाच त्यांचा सर्वात आवडता वाङ्:मय प्रकार.

''मी कवितेलाच सगळ्य साहित्याचा मध्यवर्ती भाग मानतो. कारण, कवितेत तुमची भाषा पणाला लावता येते. पूर्णपणे अंतर्मुख झाल्याशिवाय कविता लिहिता येत नाही.''असे मत डॉ. भालचंद्र नेमाडे मांडतात.

'देखणी' हा नेमाडेंचा देखणा कवितासंग्रह १९९१ साली प्रसिद्ध झाला.गोव्यात तर त्यांच्या प्रतिभेला नवोन्मेष आले.गोव्यात आपल्याला कविता पुन्हा गवसली त्यामुळे गोव्याविषयी त्यांच्या मनात आदराची भावना आहे.येथील अनुभवविश्वाचे प्रतिबिंब त्यांच्या कादंबरीतून प्रकट झाले.

## कोसलाचे वादळ

डॉ.भालचंद्र नेमाडे यांनी 'कोसला'सारखी अफलातून कादंबरी जन्माला घालावी आणि तिने भल्या–भल्या प्रस्थापितांच्या टोप्या उडवाव्यात,ही एक प्रकारे विस्फोटक घटनाच ठरली. तत्कालीन साहित्याचा सगळा प्रस्थापितांचा ओघ एका फटक्यात कालबाह्य ठरविण्याची तुफानी क्षमता 'कोसला' च्या पानात ठासून भरलेली जाणवते.

'कोसला' ही त्यांची पहिलीच कादंबरी वयाच्या २५ व्या वर्षी १९६३ साली प्रकाशित झाली.या कादंबरीने मराठी साहित्यविश्वाला धक्का दिला.या माध्यमातून डॉ. नेमाडे यांनी मराठी कादंबरीची पारंपरिक चौकटीचे स्वरूप बदलून टाकण्याबरोबरच शैलीचे नवे प्रयोग केले.यातील 'उदाहरणार्थ'चा बाजच वेगळा.या कादंबरीने साहित्याला नवा चेहरा,आयाम दिला. त्यामुळे 'कोसला' ही साहित्यातला मानदंड मानला जातो. मात्र त्या काळी या कादंबरीवर प्रचंड टीकाही झाली. त्यामुळे पुरस्कार, मानसन्मानापासून 'कोसला' ला दूर रहावे लागले. किंबहुना १९७० नंतर ही कादंबरी खऱ्या अर्थाने महाविद्यालयीन युवकांमध्ये रूजली. त्यानंतर ही एका पिढीचीच कादंबरी राहिली नाही, तर काळाच्या, वयाच्या, प्रांताच्या कक्षा ओलांडून ५० वर्षानंतर ही कादंबरी लोकांच्या हृदयसिंहासनावर विराजमान झाल्याचे दिसते.

## चांगदेव चतुष्टक

कोसलानंतर बारा वर्षांनी १९७५ मध्ये 'बिढार' ही कादंबरी आली. त्यानंतर 'हूल'(१९७५) 'जरीला (१९७७) ,'झूल' (१९७९) या देखील त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्या.मात्र,या कादंबऱ्यांना कोसलाइतकी प्रचंड लोकप्रियता मिळाली नाही.नेमाडेंना हजार पानांची महाकादंबरी लिहायची होती,मात्र ते शक्य झाले नाही अन् चांगदेव चतुष्टक निर्माण झाली.

## हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ

हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ (२०१०) ही डॉ. नेमाडे यांची बहुचर्चित अन् वादग्रस्त कादंबरी. ३५

वर्षाच्या साधनेतून हिंदू उभी राहिली.डॉ. नेमाडे यांच्या मते, हिंदू हा धर्म नव्हे;तर भू–सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहे. हे लक्षात घेऊनच ही कादंबरी साकार झाली आहे.

## उत्कृष्ट दर्जाचा समीक्षक

डॉ. नेमाडे यांचे समीक्षा व संशोधनात्मक लेखनही विचारगर्भ आहे. 'तुकाराम', 'साहित्याची भाषा,' 'टीकास्वयंवर', 'सोळा भाषणे', 'निवडक मुलाखती' ही पुस्तके अधिक रसिकप्रिय झाली. टीकास्वयंवर मधून नेमाडे यांनी मराठी साहित्याचा धांडोळा घेताना साहित्यिकांचा कठोर शब्दांत समाचार घेतला आहे.

## देशीवाद नेमाडेंच्या साहित्याचा आत्मा

देशीपणा म्हणजे मातीत मूळं असणं, अशी डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी देशीवादाची व्याख्या केली आहे. ते म्हणतात, 'समाजाच्या सगळया गरजा तुमच्या विचारातून भागत नाहीत. पण तुम्ही जे बाहेरुन घ्याल ते या मातीशी जुळवून घ्यावं लागेल. श्रेष्ठ साहित्य हे देशीच असतं.' असं नेमाडे सांगतात. असं साहित्य त्या काळात स्थळाला बांधलेलं असतं. प्रस्थापित चौकट मोडून त्यांनी मराठी कादंबरीला एक नवा आणि स्वत:चा असा चेहरा दिला. 'देशीवाद' ही संकल्पना मांडून नेमाडे यांनी भारतीय साहित्य विश्वामध्ये नवीन चर्चेला तोंड फोडलं 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीतून त्यांनी आपली देशीवादाची मांडणी अधिक स्पष्टपणे केली आहे.

" शब्दांनाही कोडं पडावं,  
असे काही साहित्यिक असतात,  
मराठी साहित्य किती भाग्यवान  
जेव्हा ते ज्ञानपीठ मिळवून देतात. "

## निवडक नेमाडे

डॉ. नेमाडे यांचे मुलाखतीचे पुस्तक अत्यंत वाचनीय असेच आहे. नेमाडे नावाचे पाणी किती खोल आहे याचा अनुभव घ्यायचा असेल तर या मुलाखती वाचायलाच हव्यात.

- सहन करावी लागत नाही ती कादंबरीच नव्हे !
- आत्मकथा ही सरळ व प्रभावी असते. या दोन्ही गोष्टींवर माझा विश्वास नाही.
- मराठीचं ज्ञान इ. वाढविण्यासाठी लिखित आणि मौखिक दोन्ही प्रकारच्या भाषावापराची साधनं, सवय आणि प्रेम वाढवणं आवश्यक आहे.
- गोव्यानं मराठी संस्कृतीला खूप देणग्या दिल्या. गोव्याचा माणूस एकूणच कलेचा भुकेला असतो.
- आत्मचरित्रे आवडत नाहीत. ती कितपत खरी असतात याबद्दल शंका वाटते. लेखकाच्या प्रामाणिकपणाबद्दलही शंका येते.

## नेमाडेंची वादग्रस्त विधाने

– साहित्य संमेलन ही सूज आहे.अशी संमेलने नामशेष व्हावीत.

– संमेलन हा रिकामटेकड्यांचा उद्योग असून हे तर उंटावरून शेळ्या हाकण्यासारखे आहे.

– अखिल भारतीय म्हणवणारी संमेलनं कालबाह्य झाली असून त्याचा साहित्यावर प्रभाव पडत नाही.

– उद्या चार मराठी माणसे असलेल्या बेटावरही संमेलन घेतले जाईल.

– इंग्रजी शाळा बंद करायला हव्यात.

– फालतू अध्यक्षापेक्षा क्रिएटिव्ह समीक्षक अध्यक्ष परवडला!

– लेखकराव हा प्रतिष्ठा,पैसा,समाजातील स्थान याच्याशी तडजोड करून बनतो.

– वाईट लेखकांमुळे माझ्या साहित्याला मागणी.

## मराठी भाषेची सेवा केल्याचा आनंद

ज्ञानपीठ मिळाल्याचा मला आनंद आहे.मराठी माणसाच्या अभिरूचीचा मला आनंद वाटतो.त्यांनी माझं लिखान सहन केलं. माझ्याविरोधात कोणीही आंदोलनं

केली नाहीत.विं.दा.करंदीकर यांच्याबद्धल मला नितांत आदर आहे. मी त्यांच्या परंपरेचा पाईक ठरल्याचा मला अभिमान वाटतो.

खरे तर मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी आम्ही प्रयत्न करतोय. मराठीसाठी आणि मराठीतून लिखाण केले त्यामुळे हा पुरस्कार मिळाला,हाच मोठा सन्मान आहे.

**मराठी साहित्यातील 'विद्यापीठांचा'सन्मान**

**डॉ.नागनाथ कोत्तापल्ले (माजी संमेलनाध्यक्ष)**

डॉ.भालचंद्र नेमाडे यांना 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाल्याबद्धल मराठी भाषेचा सत्कार झालाआहे.गेल्या ५० वर्षापासून डॉ. नेमाडे हे प्रायोगिक स्वरूपाचे मराठी भाषा समश्द्ध होईल,असे लेखन करीत आहेत. वैचारिक भूमिकेशी मतभेद असले तरी त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्धल आनंदच होतो.

**डॉ. माधवी वैद्य**

**(अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा)**

डॉ. नेमाडे यांना साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च 'ज्ञानपीठ पुरस्कार' दिल्याने मराठीची मान उंचावली आहे. घुमान येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला व्यासपीठावर बसवून त्यांचा सन्मान करण्यात आला.

**'जनस्थान' ते 'ज्ञानपीठ'**

डॉ. नेमाडे यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. 'यशवंतराव चव्हाण पुरस्कार', 'जनस्थान', 'पद्मश्री' या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. साहित्य अकादमीच्या पुरस्काराचेही ते मानकरी आहेत.आता ज्ञानपीठ पुरस्काराने त्यांचा सन्मान होत आहे.वि.स.खांडेकर,कुसुमाग्रज,विं.दा.करंदीकर यांच्यानंतर नेमाडे यांना हा बहुमान मिळत आहे.

**'पुरस्कार,मानसन्मान'**

- १९७६ : बिढार – ह. ना. आपटे पुरस्कार
- १९८४ : झूल – यशवंतराव चव्हाण पुरस्कार
- १९८७ : साहित्याची भाषा – कुरूंदकर पुरस्कार
- १९९१ : टीका स्वयंवर – साहित्य अकादमी पुरस्कार
- १९९१ : देखणी – कुसुमाग्रज पुरस्कार
- १९९२ : देखणी – ना. धों. महानोर पुरस्कार
- २००१ : महाराष्ट्र फाउंडेशनचा गौरव पुरस्कार
- २०१३ : कुसुमाग्रज प्रतिस्थानतर्फे जनस्थान पुरस्कार
- २०१५ : ज्ञानपीठ पुरस्कार

जेष्ठ साहित्यिक डॉ. भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाल्याने मराठीला खऱ्या अर्थाने अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेला आहे.कोसला,हिंदू अशा एकापेक्षा एक कादंबऱ्या, मेलडीसारखा देखणा कवितासंग्रह ; टीकास्वयंवरसारखी नेमकी समीक्षा,निवडक मुलाखतींमधला वैचारिक परिपोष,भाषणांमधील सखोलता अन् मातीला घट्ट चिकटून असलेला देशी वाद हे डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये त्यांच्यासारख्या भूमिका घेणाऱ्या साहित्यिकांचा सन्मान झाल्याने मराठीतील ज्ञानपीठाचे चतुष्टक पूर्ण झाले आहे. नेमाडे यांच्या रूपाने इथल्या मातीत खोलवर मूळे रूजलेल्या खऱ्याखुऱ्या देशी साहित्यिकाचाच सन्मान होत आहे.

" दु:खाचा अंकुश असो,सदा मनावर
हलाहल पचवल्याबद्धल माथ्यावर चंद्र असो
चांगली माणसं मोजण्यासाठी, हाताला हजार
बोटे असोत !"

(डॉ. भालचंद्र नेमाडे – 'देखणी' काव्यसंग्रह)

# वंशाचा दिवा पाहिजे

✍..... किरण बळवंत गोडसे (बी.ए.भाग-२)

मुलगी : बाबा, बाबा ओ बाबा.. आई

बाबा : कशाला ओरडतेस, तुझा भाऊ झोपलाय ना?

आई : अहो, पोर शाळेतून आलीया कशाला ओरडताय?

मुलगी : आई मी शाळेत पहिली आले.

आई : अगंबाई, गुणाची माझी बाय.

बाबा : हिला शिकवून तरी काय फायदा. ती जाणार दुसऱ्यांच्याच घरी, आम्हाला तरी काय मिळणार?

आई : आवं, पोरीचं कवतुक करायचं सोडून काय वंगाळ बोलताय, पोर काम करुन साळत पहिली आली.

बाबा : मग तिची काय आरती ओवाळू?

बाई : तो पहा तुमचा दिवा कॉलेजमध्ये नापास होऊन आलाय आणि माझी पोर साळंत पहिली आलीय.

बाबा : काही झालं तर तो माझ्या वंशाचा दिवा आहे, माझी पिढी पुढे चालवणारा तो माझा वारस आहे.

आई : आवं, आपलं पोर वाईट संगतीला लागलंय. त्याला लवकरच आळा घातला पाहिजे.

बाबा : त्याला कुणी काही बोलायचं नाही.

मुलगी : का, पण का बाबा... तो वंशाचा दिवा आहे म्हणून त्याला कोणी काही बोलायचं नाही का?

आई : बाळ, बाबांना बोलायचं नस्तं असं.

बाबा : बगीतलीस, शाळेत जाऊन लेकीची जीभ कशी चुरु चुरु चालू लागली आहे.

आई : आवं, असं काय नाय

मुलगी : आई मला आज बोलू दे

बाबा : बगीतलीस अजून ही चर-चर जीभ चालते हिची.

मुलगी : बाबा, तुम्ही या वंशाच्या दिव्यासाठी माझ्या कित्येक बहिणींचा जीव घेतलात.

आई : अगं, शांत बस आता.

मुलगी : आज मी बोणार आई, बाबा तुम्ही कित्येक मुलींना मारलं त्यांना जगण्याचा हक्क नव्हता का?

आई : आता बस करा तुमचं भांडण, रात झाली आता जेवायला चला.

मुलगी : नको मला जेवण. पोट भरलं आता माझं.

बाबा : माझ्या लेकराला उद्या मी नवीन कपडे घेणार आहे. आपण उद्या बाजारात जाऊया ना बाळा.

आई : आवं, लेकीला पण दोन ड्रेस घेवून या की. पोर आता कॉलेजला जाणार मग तिला कापडं नकोत का?

बाबा : नाही! मुलीच्या जातीनं आता मूल आणि चूल सांभाळायची. उद्याच तिची बोलणी पाटलाच्या मुलाशी करणार आहे.

मुलगी : बाबा, मी सासरी गेल्यानंतर तुम्हाला माझी खूप आठवण येईल.

आई : आवं, आपलं पॉर दारु पिऊन आलंय.

बाबा : अगं, आता आपल्या पोराचं लगीन करुया मग तरी सुधारल ते.

आई : आवं, आपण पोराचं लगीन केलं तरीपण आपलं पोर सुधारलं नाही. आज तुम्हाला त्यानं मारलं ना.

बाबा : मग आपल्या पोरानं आपल्याला मारलं तरी आपण कुठं जायचं?

आई : अहो आपण आपल्या लेकीकडे जावूया.

बाबा : कोणत्या तोंडानं आपण आपल्या लेकीकडं जायचं?

आई : कावं, ती आपली पोर हाय ना चला जाऊ या

मुलगी : आई-बाबा आलात? या ना घरात बसा मी तुमच्यासाठी चहा आणते.

बाबा : (डोळ्यातून पाणी येतं) मी खूप चुकलो ग मुलगा आणि मुलगी मध्ये भेदभाव करुन मी खूप चुकलो.

आई : आवं काय तरी काय बोलताय?

मुलगी : (दरवाजातून ऐकून) बाबा नका असं बोलू मला कळालय की दादानं तुम्हाला घरातून बाहेर काढंलय पण तुम्ही काळजी करु नका तुमची मुलगी तुमच्या पाठीशी आहे.

बाबा : जिंकलस ग पोरी जिंकलस. आता मला कळालं की मुलगा व मुलगी यांच्यात भेदभाव करुन मी चुकलो.

मुलगी : नाही बाबा नाही. आई-वडील कधी चुकत नसतात. त्यांनी आपल्या मुलांकडून माफी मागायची नसते. त्यांचा हात फक्त आशीर्वाद देण्यासाठी असतो माफी मागण्यासाठी नाही.

बाबा : धन्य आहेस तू पेरी. मी सर्वांना हेच सांगेन की मुलगा व मुलगी मध्ये भेदभाव करु नका.

:-:-:-:-:-:-

# सुखी जीवनासाठी

१) सत्य नेहमी कठीण परिश्रम घेते.

२) प्रत्येक गोष्ट बारकाईने पाहिल्यास मोठे संकट उभे राहत नाही.

३) माणसाने पैसा नाही, माणुसकी कमवली पाहिजे.

४) अन्नदानापेक्षा विद्यादान हे सर्वश्रेष्ठ आहे. कारण अन्न हे क्षणिक सुख आहे तर, विद्या हे आयुष्यभर पुरते.

५) माणसाला स्वतःचे मन ओळखायचे असेल तर, प्रत्येक जागी स्वतःला पहावे.

६) माणूस हा असा एकच प्राणी आहे की, तो प्रत्येकवेळी स्वार्थ साधतो.

७) देवाचा अंश हा प्रत्येक सजीवात असतो.

८) प्रत्येक वेळी काहीतरी नवीन शिकण्याची वृत्ती असावी.

९) अनुभव हाच सर्वात मोठा शिक्षक आहे.

१०) प्रत्येक चूक ही काहीतरी शिकवत असते.

११) देवाकडे मन्नत मागा आणि त्याचे दान गरजू गरीबाला करा.

१२) आपले शरीर हे देवाकडून भाड्याने घेतले आहे आणि म्हणून त्याच्याकडून भरपूर काम करुन घ्या.

१३) वेळ ही हाताच्या मुठीतून वाळू निसटावी तशी निसटत असते.

१४) चांगली गोष्ट लक्षात येताच अमलात आणा.

१५) कितीही जड काम मन लावून केल्याने कितीतरी पटीने हलके होते.

१६) आई-वडिलांचे प्रेम समजून घ्यायचे असेल तर, मुल व्हायचे वाट पहा.

१७) एकदा बोललेले शब्द घोड्यापेक्षा जास्त गतीने धावतात.

१८) मूर्ख मित्रापेक्षा बुद्धीमान शत्रू बरा.

१९) जगात दोन प्रकारची माणसे प्रगती करतात -

१. ज्याच्याकडे भरपूर पैसा आहे.

२. ज्याला परिस्थितीची जाणीव आहे.

२०) ज्याच्या मनात सकारात्मक विचार येतात तो नक्कीच विजयी होतो.

**-केतन गणपती बिद्रेवाडी**

१२ वी कला

# मी मराठी

✍..... कु. स्नेहलता दत्ताद्धत्रय यळूरकर (एम.ए.भाग-२)

'मी मराठी' या दोनच शब्दात आपली ओळख दडलेली आहे. मी मराठी आहे याचा मला सार्थ अभिमान आहे. मराठीचे अस्तित्व अबाधित ठेवण्याचे सामर्थ्य आजही आपल्या मनगटात आहे. याची सार्थ जाणीव 'मी मराठी आहे.' असे सांगण्यातून होते.

''धन्य हा महाराष्ट्र
लाभली आम्हा आई
बोलतो आम्ही मराठी
ही गत जन्माचीच पुण्याई''

आपल्या मराठ्यांचं मराठी बांधवाचं स्वतंत्र असे अस्तित्व अबाधित ठेवण्याचे काम महाराष्ट्राने केले आहे. अनेक अडथळ्यांना सामोरे जाऊन स्वतःचे वेगळेपण आजतागायत अबाधित ठेवण्याचे धाडस केले आहे, अशा या निधड्या छाती लाभलेल्या महाराष्ट्राची घौडदौड ही ऐतिहासिक काळापासून मोठ्या दिमाखात चालली आहे.

महाराष्ट्राचे उगमस्थान शिवाजी महाराज यांनी मोठ्या जिकरीने प्राणांची पर्वा न करता स्वराज्याची स्थापना केली आहे. स्वराज्याच्या वेलीला मायेचा आधार देऊन आनंदाने फुलवायचे कामही त्यांनीच केले. अनेक मोठ मोठे पराक्रम गाजवून महाराष्ट्रात वेगळे असे स्थान मिळवून देण्याचे कामही त्यांनीच केले.

असे हे मराठे पानिपतच्या युद्धातही कसे फिके पडतील. पानिपतच्या युद्धातही मराठे प्रतिस्पर्धांवर भारी पडले. बाजीरावांनी युद्धात पराक्रम गाजवून महाराष्ट्राची मान उंचावली. त्यानंतर आला तो काळ इंग्रजांना लढा देण्याचा, स्वातंत्र्य मिळवण्याचा. त्याही परिस्थितीत हे मराठे काही मागे हटले नाहीत. लोकमान्य टिळक, वि.दा. सावरकर, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादीने आपल्या प्राणांचे पुष्प भारतभूमीच्या चरणी अपर्ण केले आहे.

अटकेपार झेंडे लावण्याचे कामही मराठ्यांनीच केले. म्हणूनच मराठी संस्कृती भारताच्या मुकुटावर तुरा बनू शकली. फक्त मराठी लोकच नव्या वर्षाची सुरुवात गुढी उभारुन करतात. पांडुरंगाचे भक्त ज्या संप्रदायात असतात, तो वारकरी संप्रदायही फक्त महाराष्ट्राच्या कुशीत सामावलेला आहे.

आज मराठे सर्वच क्षेत्रात आपले अस्तित्व गाजवू लागले आहेत. मराठी अस्मितेचा गौरव करु लागले आहेत. आज देशाचा पहिला नागरिक होण्याचा मानही मराठी व्यक्तीनेच पटकावला आहे.

आम्ही मराठे आपला सन्मान गहाण ठेवून कधी कोणापुढे वाकलो नाही. कधी कोणापुढे लाचार ही झालो नाही आणि कधीही वादळांना घाबरलो नाही. महाराष्ट्राच्या मातीनं शिकवले आहे आम्हाला झगडायला, निधड्या छातीने आलेल्या संकटांना सामोरे जायला.

इतिहास तर साक्षीला आहेच पण आज आपण उज्वल असं भविष्यही घडवत चाललो आहोत. पण काळाच्या ओघात आपल्या जीवनाच्या कक्षा गोठू लागल्या आहेत. आपल्याकडील माणुसकीचा ऱ्हास हळूहळू होऊ लागला आहे.

मराठी माणसांची येथील परंपरा आणि संस्कृती जतन करणे हा विचार आपल्या मनात घर करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. आणि याच्यातून प्रेरणा घेऊन तरुण वर्गाने मराठीचा पर्यायाने महाराष्ट्राचा गौरव करावा.

:-:-:-:-:-

# लक्षात नसलेला बाप

✍..... संकलन - बाळकृष्ण बाळू परीट (एम.कॉम.भाग-२)

वडील, बाबा, पप्पा, डॅडी, पिता लिहिण्याला बोलण्याला खूप चांगलं वाटतं पण आपण प्रत्येकजण सहजपणे नेहमी जाणून-बुजून शब्द उच्चारतो तो म्हणजे 'बाप' होय. होय बाप! त्याच बापाविषयी थोडंफार...

आई घराचं मांगल्य असते, तर बाप घराचं अस्तित्व असतो. पण या घराच्या अस्तित्वाला खरंच आम्ही कधी समजून घेतलं आहे का? वडिलांना महत्व असूनही त्यांच्याविषयी जास्त बोललं जात नाही... लिहिलं जात नाही. कोणताही व्याख्याता त्यांच्याविषयी जास्त बोलत नाही, लिहित नाही. पण कोणताही व्याख्याता आईविषयी जास्तवेळ बोलत राहतो. संत महात्म्यांनी आईचंच महत्व सांगितलं आहे. देवादिकांनी आईचंच तोंड भरुन कौतुक केलं आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली जाते. बापाविषयी कुठेच जास्त बोलले जात नाही. काही लोकांनी बाप रेखाटला पण तो तापट, व्यसनी, मारझोड करणारा, समाजात एक दोन टक्के बाप असे असतीलही, पण चांगल्या पित्याबद्दल काय? चांगल्या वडिलांबद्दल काय? आईकडे अश्रूंचे पाट असतात तर बापाकडे संयमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते, पण सांत्वन वडिलांनाच करावे लागते. आणि रडणाऱ्यापेक्षा सांत्वन करण्यावरच जास्त ताण पडतो. कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते ना? पण श्रेय मात्र ज्योतीलाच मिळते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आमच्या लक्षात राहते पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आपण सहज किती विसरुन जातो. आई रडते पण वडिलांना रडता येत नाही. स्वतःचा बाप जरी वारला तरी रडता येत नाही. कारण छोट्या भावंडांना जपायचं असतं. आई गेली तरी रडता येत नाही कारण बहिणींना आधार व्हायचे असते. पत्नी अर्ध्यावर जरी सोडून गेली तरी पोरांसाठी अश्रूंना आवर घालायला असतो. जिजाबाईंनी शिवाजी घडविला असं अवश्य म्हणावं. पण त्यावेळी शहाजीराजांची ओढाताण सुद्धा लक्षात घ्यावी. देवकीचं, यशोदेचं कौतुक अवश्य करावं पण पुरातून डोक्यावर पोराला घेऊन जाणारा वासुदेव लक्षात ठेवावा.

राम हा कौशल्याचा पुत्र अवश्य असेल पण वियोगात तडफडून मरणारा पिता दशरथ होता. वडिलांच्या टाचा झिजलेल्या चपलांकडे पाहिलं की त्यांचं प्रेम कळतं. त्यांची फाटकी बनियान पाहिली की कळतं की आमच्या नशिबाची भोकं त्यांच्या बनियानला पडली आहेत. त्यांचा दाढी वाढलेला चेहरा काटकसर दाखवितो. मुलीला गाऊन घेतील, मुलाला कपडे घेतील पण स्वतः मात्र जुनी पँट वापरायला काढतील. मुलगा सलूनमध्ये २०-२५ रुपये खर्च करतो. मुलगी ब्युटी पार्लरमध्ये कित्येक रुपये खर्च करते. पण त्याच घरातला बाप दाढीचा साबण संपला म्हणून अंघोळीच्या साबणाने दाढी खरवडत असतो. अनेकदा तो नुसतं पाणी लावून दाढी करतो. बाप आजारी पडला तर पटकन दवाखान्यात जात नाही. कारण पोरीचं लग्न, पोराचं शिक्षण बाकी असते. घरात उत्पन्नाचे दुसरं साधन नसतं. ऐपत नसते तरी पोराला मेडिकलला, इंजिनिअरींगला प्रवेश मिळवून दिला जातो. ओढाताण करुन, मुलांना दर महिन्याला पैसे पाठविले जातात. पण सर्वच नसले तरी काही मुले असतात की, त्या तारखेला पैसे येताच मित्राला परमिटरुमला पार्ट्या देतात आणि ज्या बापांनी पैसे पाठविले त्याच बापाच्या नावाने एकमेकांच्या बापाला हाका मारतात. वडिलांची टिंगल करतात...

आई घराचं मांगल्य असते तर बाप घराचं अस्तित्व असतो. ज्या घरात बाप आहे त्या घरात वाईट नजरेनं कुणीही बघू शकत नाही. तो जरी काही करत नसला तरी तो त्यापदावर असतो. म्हणजेच घरातला कर्ता जिवंत असतो आणि घरच्यांचे कर्म बघत असतो. कोणाचा मुलगा होणं टाळता येत नाही, पण बाप होणं टाळता येतं. पण बाप कधीच

बाप होण्याचं टाळत नाही. आईच्या असण्यानं किंवा आई होण्यानं बापच व्यर्थ असतो. कोणत्याही परीक्षेचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते. कारण ती जवळ घेते. कवटाळते, कौतुक करते. पण गुपचूप जाऊन पेढ्यांचा पुडा आणणारा बाप कोणाच्याच लक्षात येत नाही. पण हॉस्पिटलमध्ये एखादा पेशंट घरचा आहे, तो मृत्यूशी झुंज देत आहे त्यावेळी हॉस्पिटलच्या आवारात अस्वस्थपणे वावरणाऱ्या त्या बापाची कोणीही दखल घेत नाही. जर चटका बसला, ठेच लागली, फटका लागला 'आई गं' हा शब्द बाहेर येतो. पण हायवेवर रस्ता ओलांडताना एखादा ट्रक जवळ येऊन कचकन ब्रेक लावतो तेव्हा 'बाप रे' हा शब्दच बाहेर पडतो. कारण छोट्या-छोट्या संकटांना आई चालते पण मोठ-मोठी वादळे पेलताना बापच आठवतो. काय पटतंय ना? कोणत्याही मंगलप्रसंगी घरातील सर्व मंडळी जातात पण मयताच्यावेळी फक्त बापालाच जावं लागतं. कोणताही बाप श्रीमंत मुलीच्या घरी जास्त जात नसतो. पण गरीब लेकीच्या घरी उभ्या-उभ्या का होईना चक्कर मारतो. तरुण मुलगा उशीरा घरी येतो तेव्हा त्याची आई नाही बापच जागा असतो. मुलांच्या नोकरीसाठी साहेबांच्यापुढे लाचार होणारा बाप, मुलींच्या स्थळासाठी स्वतःच्या व्यथा दडपणारा बाप, खरंच किती ग्रेटच असतो ना? वडिलांचं महत्व कुणाला कळतं? लहानपणीच वडील गेल्यावर अनेक अनेक जबाबदाऱ्या खूप लवकर पेलाव्या लागतात, त्यांना एक-एक वस्तूसाठी तरसावं लागतं. त्यांनाच फक्त वडिलांचं महत्व कळतं.

पण वडिलांना खऱ्या अर्थाने समजून घेते ती मुलगी, त्या घरातील मुलगी सासरी गेलेल्या आणि घरापासून दूर असलेल्या मुलीला बापाशी फोन वर बोलतांना बदललेला आवाज लगेच लक्षात येतो. मग ती अनेक प्रश्न विचारते. पण कोणतीही मुलगी स्वतःची इच्छा बाजूला ठेवून बाप म्हणेन त्यावेळी विवाहाच्या बोहल्यावर चढते. कारण मुलगीच वडिलांना जाणते व जपते. इतरांनीसुद्धा असंच आपाल्याला जाणावं हीच बापाची किमान इच्छा असते. म्हणून वडिलांना सर्वांनी जाणावं व त्यांच्याशी प्रेमाने वागावं हीच माझी इच्छा!!!

हे सिद्धीविनायका, हे लंबोदार, हे गणराया तुझ्याचरणी हीच प्रार्थना इथे असणाऱ्या आणि वाचणाऱ्या समस्त जणांस सद्बुद्धी दे! सद्बुद्धी दे! सद्बुद्धी दे!

हीच ईश्वरचरणी प्रार्थना



# माझी बोली मालवणी

✍..... अमन अजय चव्हाण (एम.कॉम.भाग-२)

महाराष्ट्रात विविध प्रांतात बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषा हे मराठी भाषेचं वैशिष्ट्य आहे. 'अमृतातेही पैजा जिंके' अशा अमृताक्षरांनी ज्ञानदेवांनी या भाषेची महती लिहून ठेवली आहे. मानवी समाज व्यवहारात कुठलीही भाषा समृद्ध होत असताना त्या भाषेवर जनजीवनाचे प्रतिबिंब उमटते. किंबहुना मानवी संस्कृतीचा अभ्यास बोलीभाषेच्या अभ्यासाशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. कित्येक बोलीभाषांनी माझ्या मराठीचे दालन समृद्ध केले आहे. प्रत्येक १२ मैलावर भाषा बदलते असे म्हणतात. आणि याचे स्वरूपही खूप गमतीशीर असतं. ही जर गंमत व नजाकता अनुभवायची असेल तर आपल्या व्यस्त जीवनातून वेळात वेळ काढून आपल्या आजूबाजूला बोलल्या जाणाऱ्या बोलीभाषेवर लक्षपूर्वक कानांनी नजर टाकली पाहिजे.

आज मी आपल्यासाठी एका अशाच सुश्राव्य व अवीट गोडीच्या 'मालवणी' या भाषेचा अल्प असा परिचय करून देणार आहे. कारण ती माझ्या जन्मभूमीची बोलीभाषा आहे. माझा जन्म कुडाळ तालुक्यातील माणगांव या गावी झाला.जन्मल्यापासून इ. १० वी पर्यंतचे शिक्षण मी येथेच घेतले. त्यामुळे या भाषेच्या संस्कारातच मी वाढलो. अवतीभवती, शाळेत, मित्रमंडळीत नेहमी याच भाषेचा वापर. शाळेत शिकवताना प्रमाणित मराठीचा वापर जरी झाला तरीही इतर देवाणघेवाण याच भाषेत. मित्रहो मच्छींद्र कांबळीच्या वस्त्रहरण या नाटकामुळे मालवणी भाषा साता समुद्राच्या पार पोचली. या बोलीतले सौंदर्य जगापुढे यायला हवे या ध्यासाने प्रेरित होऊन त्यांनी हे सिद्ध करून दाखवले. चला तर मग आनंदाभूती घेऊया या नादमधूर व अवखळ अशा मालवणी भाषेतील म्हणींचा.

मालवणी भाषेबद्दल असा एक गैरसमज आहे की त्या शिव्यांची रेलचेल असते. पण मुळात मालवणी भाषेचा व माणसाचा अंगभूत गुण म्हणजे मोकळेपणा आणि मोठ्याने बोलणे. सहज उत्स्फूर्ततणे बोलताना त्यात सहजपणा व बेरकी खवचटपणा ही असतो. म्हटली जाते ते म्हण इथे काही ठरवून होत नाही. दैनंदिन आचार विचार शिष्टाचार, जीवनातील विसंगती नेमकेपणाने हेरून ती सुसंगती कशी होईल या सर्वांचा विचार या म्हणींमध्ये आहे.

घरात परिस्थिती फार वाईट असताना सुद्धा बाहेर मात्र डौल दाखवला जातो.

गावत्यात गोरवा आणि भटाक तारवा.

गावित म्हणजे मच्छीमारी करणारे. त्याला गाई-गुरे काय उपयोगाची आणि भटजी म्हणजे ब्राम्हणाला तारवा म्हणजे होडी (मच्छीमारीची) काय करायची. म्हणजे आपल्याला जमेल तोच व्यवसाय करावा.

हावरा माझा मन नी गावाआधी सन

सणाच्या निमित्ताने जेव्हा गोडधोड केलं जातं तेव्हा हावरट स्वभावाच्या सुनेला अनुभवी वृद्ध साधू सहज म्हणून जाते. असाच हावरटपणा करणाऱ्याला म्हणजेच पहिली पंगत उठली की नंतर घरातील स्त्रियांची पंगत बसते. या प्रथेला छेद देणाऱ्या स्त्रीला एखादी वृद्धा खडसावताना म्हणते, 'आदि माका वाडा मगे कामाचा गाडा', तुमच्या उष्ट्याबरोबर माझं उष्टं सुद्धा तुम्हीच काढा. (आधी मला जेवण वाढा, मग कामाचे काय ते बघू, जमलं तर तुमच्या उष्ट्याबरोबर माझं उष्टं सुद्धा तुम्हीच काढा) एखाद्या लग्नसमारंभाला जर एखादी स्त्री खूपच भडकपणे नटून आली तर त्या तरुणीला लगेच समवयस्क बायका टोमणा हाणतातच 'झगामगा नी माझ्या ऽऽ रं बघा'

'सात-पाच कापडा नी नटतंय गे बापडा'

'नाकापेक्षा मोती जड संसारात मागे कर्मानं रड' तर सामान्य रुपाची स्त्री जर विसंगत पोषाख करुन आली आली तर हळूच पण तिला ऐकू जाईल अशा आवाजात टोमणा हा ठरलेलाच -

''गाव नाचता म्हणून हाव नाचता,
बुवा गाता म्हणून रेडो वराडता'' इथे बुवा म्हणजे गवई.

आपल्याला आवतीभोवती नेहमीच आळशी लोक दिसतात. त्यांच्यातली विसंगती खूप चांगल्या पद्धतीने दाखवून दिली आहे. काम ठरलेल्या वेळी न करणाऱ्याला 'आदो मिरग सरलो आणि म्हाराच्या पोरानं उतव केलो.' म्हणजेच आद्रा, मृग नक्षत्र संपत आले आणि आत्ता घोंगडी वाळवण्यासाठी उत्तव (विस्तवावर कपडे सुखवण्यासाठी केलेली मंडपी) केला. तर ध्यानी मनी नसतांना एखाद्याने काम केले तर 'आदी नाय मदी आनी आयतावार (रविवार) कदी?' असा खोचक प्रश्न ठरलेलाच असतो, खावक आदी, न्हीजाक मदी आनी कामाक कदी कदी ही टीका खादाड, भितऱ्या, आळशी माणसांसाठी ठरलेलीच. कामावर लक्ष नाही त्यांचे वर्णन करताना 'ध्यान गेला धाय (दहा ठिकाणी) कडे, घागर फुटली बायकडे' (विहिरीवर) तर काम न करण्याचे निमित्त सांगण्याला 'नाय करुचे भाषे बोडगीचे वासे' ही म्हण ठरलेलीच.

नेहमी मिशीला तूप लावून फिरणाऱ्यांची तर मालवणी भाषेत फिरकीच घेतलेली आहे. 'माझ्या घरात काय उना अरदी भाकरी चौगा सुना आणि टकली सुकली (फुटली) तेला गुना' म्हणजे बाहेर याच्या मोठ्या बाता घरात साथ डोकीवर घालायला तेल नाही. 'मानाची बाय आनी उकडी पेज खाय' 'माज्या बाबाची सातपाच' 'उसला (बंगले) आनी ढबक्या आम्या बुडी पासला' 'खिशात नाय अरदी आनी फुकटची गर्दी' 'खिशात नाय काजू आणि बायत (विहीर) सोडता राजू (दोवी) बोल बादशाचे दुकान कुरमुऱ्यांचे अशा अनेक म्हणी फुशारकी मारणाऱ्या लोकांसाठी आहेत.

दुसऱ्याकडे आहे ते आपल्याकडे नाही म्हणून प्रयत्न न करता दुःख करीत बसणाऱ्यांना सुद्धा उपमा देताना सहज कुणीतरी म्हणजे 'तेलकरीन रडता म्हणून नालकरीन रडता' म्हणजे तेल काढणारी तेलीन नारळ घाण्यावर लावायला नाहीत म्हणून रडते तर घरात नारळ असून तेल नाही म्हणून नारळ असणारी रडते. 'दिसला मडा काय येती रडा' ही म्हणही त्यातलीच. संबंध नसताना, उठाठेव करणाऱ्याला 'देना नाय घेना आनी कंदिल लावन येना' प्रत्येक गोष्टीची वेळ ठरलेली असते हे सांगातना 'येळार येळ आनी शिमग्यार खेळ' ही म्हण तर वस्तूचा वापर व्यवस्थित झाला नाही तर ती बिघडते हे सांगताना खालील म्हणी वापरतात. 'सोळा हात लुगडा आनी अर्दा पाक्या उगडा' 'म्हाराची पालखी बगून बगून मोडली' 'रागानं केला रायता आनी दुस्म्नाक गावला आयता.'

नेहमीच्या वापरात बोलता बोलता अशा कितीतरी म्हणी बोलल्या जातात. पु.ल. देशपांडेंनी कोकणी माणसाचं वर्णन 'व्यक्ती आणि वल्लीत' केलं. तर मालवणी इरसाल माणसांचं वर्णन जर त्यांनी केलं असतं ना तर 'दुग्धशर्करायोग' आला असता. विसंगती नेमकी हेरावी तर अस्सल मालवणी माणसाने. कारण तर्काची विलक्षण बुद्धी त्यांच्या ठायी जात्याच असते. फक्त ती चांगल्या भाषेत न सांगता आपल्या शिवराळ मालवणी फटकळ (फाटक्या तोंडाने) शैलीत तो बिनदिक्कत सांगतो. इतक्या सहजपणे तो सांगतो की समोरच्याला काय वाटेल हा विषयच नसतो. कारण इथे पोटचे राखून ठेवायचे हा भागच नसतो. जे काही आहे ते इरसाल, रोखठोक आणि सडेतोड.

# अथांग

✍..... भाग्यश्री शिवाजीराव देसाई (बी.एस्सी.भाग-२)

विश्व अनंत आहे, अथांग आहे. या विश्वाचा ठाव लागणे निदान माणसाला तरी अशक्य आहे. कितीही विज्ञान पुढे जावो आत्ता कुठे विश्वाचा एक अष्टमांश भागच माणसाला उलगडलेला असावा. अजूनही तो कितपत कळला आहे याबद्दल खुद्द शास्त्रज्ञानांही शंका आहे, कारण विश्वात विविध घडामोडी विश्वाच्या नियमाप्रमाणे घडत असतात. कधी त्या आपल्याला जाणवतात तर कधी नाही. न दिसणारे विश्व दिसणाऱ्या विश्वापेक्षा फार मोठे आहे. त्यामानाने अंतरिक्ष यानांच्या झेपा कमीच पडतात, दुर्बिणी थकतात. कुठला नवीन पदार्थ या विश्वात तयार होईल आणि कुठला पदार्थ नाहीसा होऊन तो पुन्हा नवे रुप धारण करेल ते सांगता येत नाही. अब्जावधी वर्षांचा हा विश्वाचा प्रवास अनाकलनीय आणि अथांग आहे. तरीही त्याच्या शोधाचा शोध घेणे हे मानवाचे विश्व कुतूहल निश्चितच वाखाणण्याजोगे आहे. या कुतूहलातूनच कलावंतांना विश्व कसे दिसते हे जाणून घेण्याची वेगळी जिज्ञासा असते. कलेच्या प्रतिभेचा पोत हा ज्याचा त्याचा भिन्न असतो. अवलोकन शक्तीही वेगवेगळ्या असतात. आपण त्यांना कितपत समजून घेतो हा खरा महत्वाचा प्रश्न असतो आणि तेच कलावंतांपुढे मोठे आव्हान असते.

कलावंतांचे मन विश्वाच्या शोधात नेमहीच रमते. ती त्याची जिज्ञासा ठरते. या जिज्ञासेला आकाश मदत करते. नक्षत्र त्याचे सोबती ठरतात. अंतरिक्षांमधील अवकाश त्याचे सोयरे बनतात. पृथ्वीच्या मातीतील निरनिराळी आश्चर्ये त्याला थक्क करतात. मग तो कधी डोंगरांशी मैत्री करतो तर कधी नद्यांना आपले मन मोकळे करुन दाखवितो. सप्तसागरांच्या पलीकडे असलेला अज्ञाताचा प्रदेश त्याला फिरावासा वाटतो. समुद्राच्या पोटात काय, काय दडलेले असते हे बघायला विज्ञान उत्सुक असते, परंतु समुद्राची अथांगता कलावंताना मोहिनी घालते. न मोजता येणारी प्रकाशाची घरे त्याला सुखवून जातात. वालूकामय प्रदेशाची अथांग वैराणता त्याला थक्क करते. हे सारे मिळून त्याला अथांगतेविषयी जाणून घ्यावेसे वाटते.

ज्याचा थांगपत्ता कधीही लागत नाही तरीही त्याच्याबद्दल कमालीची उत्सुकता प्रतिभावंताला सतत जागत ठेवते त्याला अथांग म्हणतात. आयुष्य कमी पडेल तरीही जे काय कळायला हवे ते कळणार नाही. ही प्रतिभेला जाणीव असूनही प्रतिभा सतत त्या ध्यासातून कलावंतांना अथांग करीत असते. त्याच्या जाणीवतेचे व्यापकपण वाढवित असते. कवीश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या दोन अप्रतिम ओळी आठवतात 'कालंबसाचे गर्वगीत' या कवितेत कुसुमाग्रज लिहितात, 'अनंत आमुची ध्येयासक्ती । अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला ॥'

ही जगण्याची अथांगता मृत्यूवर मात करते. दुःखाला श्रीमंत करते, वेदनेला आयुष्याचा वेध देतो. जगण्याच्या वाटा दाखविते. वाटांमधून स्वतःच्या नव्या वाटा निर्माण होतात. वाटांवरती प्रश्नांचे वृक्ष तयार होतात. ते वृक्ष अनुभवाच्या सावल्या निर्माण करतात. त्याचा प्रवास पुढे चालूच असतो. प्रवासाला थकवा नसतो. प्रवास कधीही मैलांचे दगड मोजीत बसत नाही. प्रवास फक्त पुढे जाण्याचा ध्यास धरतो. ही अथांगता माणसाच्या जीवनाला जिद्दीचे अंगण देते. निष्ठेचे आभाळ देते. श्वासाला धीर देते. विश्व हा आपला 'गॉडफादर' मानते. तोच खरा आद्य गुरु आहे. तो आपल्याला सारे काही खुल्या मनाने शिकवितो. जन्म आणि मृत्यूच्या मनाला व्यापक करतो त्याला अथांग म्हणतात. क्षितिजांनी कधीही रजा घेतलेली नाही. आकाश कधीही झोपलेले नाही. सूर्याने कधीही मेडिकल रजा मागितलेली नाही, नदीने बोनससाठी आंदोलन केले नाही. कारण या साऱ्यांनी जपलेली अथांगता ही त्यांच्या चैतन्याची संजीवनी आहे.

'मी' पणा सोडून जो व्यापक मनाने विश्वाचा वेध

घेण्याचा सातत्याने प्रयत्न करतो, सृष्टीची कुतूहलाची नवनवी उद्याने धुंडाळतो, आयुष्याच्या नव्या पानांवर चांगल्या कृतींचे समास निर्माण करतो, सतत दुसऱ्यांसाठी झिजतो या सगळ्या अथांगतेच्या पणत्या आहेत. तुम्ही किती जगता याला महत्व नाही, तुमच्यातल्या कृतीची अथांगता किती आहे हे महत्वाचे असते. तेच तुमच्या जगण्याचे आधारकाडे असते. यातून तुमच्या जगण्याचा आलेख कधी उंचावतो आणि कधी खाली येतो. यामध्ये जो मनाचा तोल साधून अखंड काम करीत राहतो तो अथांग असतो. त्याच्या प्रतिभेला नवनवे धुमारे फुटतात. नवनव्या कल्पनांचे धबधबे त्याच्या मन पहाडातून खळाळतात. जगण्याचा नवा सूर्य तो होतो. प्रकाशाला मित्र मानून सोबत जातो. जीवनाला नव्याने सामोरा जातो.

सागराची अथांगता मानवी मनाला सभ्यता शिकविते. या अथांगतेच्या मंथनातून मौलिक रत्नेही बाहेर पडतत. पण कधी कधी अन्यायाचे हलाहल विषही पचवावे लागते. समुद्र कितीही उधाणलेला असो, त्याच्या सुनामी लाटा कितीही उंच आदळो, परंतु तो त्याच्या मर्यादेच्या काठांशी नेहमी इमान राखतो त्याप्रमाणे जशी मनाची अथांगता ज्याला अनुभवता येते तो आपली सभ्यता आणि सुसंस्कृतपणा आपला श्वासोच्छवास मानतो.

अथांगतेतून बरेच काही घेण्यासारखे असते. सृष्टीची विराटता अथांगतेतून अनुभवावी लागते. याला विश्वरुप दर्शन म्हणतात. हाच खरा जीवनयोग आहे. जन्माला येण्याचे सार्थक यात आहे नाहीतर क्षूद्र किडेमकोडे चिखल निर्माण करुन वळवळत राहतात व तिथेच संपतात. पण जगण्याच्या ध्यासातून जो जगण्याला सुंदर करुन दाखवितो, जगण्याची सत्यता पडताळून पाहतो आणि आपल्या कृतीला जो शिवत्व देतो त्या अथांगतेला सत्यम, शिवम, सुंदरम म्हणतात.



# आजच्या तरुण पिढीपुढील आव्हाने

✍..... अजित रघुनाथ पाटील (बी.एस्सी.भाग-२)

भारतासमोर बरेच प्रश्न उभे आहेत. दहशतवाद हा भारतासमोरील गंभीर प्रश्न आहे. आजपर्यंत आपण दहशतवादाची चुकीची संकल्पना करुन घेतली आहे. प्रचंड जाळपोळ, खून, कत्तली, बॉम्बस्फोट करणे म्हणजे दहशतवाद नाही तर समोर घडणारा अन्याय, अत्याचार पाहून माणसाच्या रक्ताला फुटणारी उकळी थंडावणे, अन्याय करणाऱ्यांबाबत मनात भीती बाळगणं, लढण्यापूर्वीच शस्त्र खाली टाकणं, अन्यायाचा प्रतिकार न करणे म्हणजे दहशतवाद होय.

भारताची अवस्था आज एका खेळासारखी झाली आहे. स्वतःला शांतीदूत म्हणून घेणाऱ्या आणि जागतिक स्तरावर नैतिक भूमिका उंचावण्यासाठी हातातील शस्त्रे टाकून डोळ्यावर पळपुट्या सहनशितलतेची पट्टी बांधलेला भारत हा आज जगातल्या लहान राष्ट्रासाठी चेष्टेचा विषय बनला आहे.

भारतासमोर बेकारी एक मोठा प्रश्न आहे. तरीदेखील भारत सरकार यासाठी कुठल्याच उपाययोजना करत नाही. या बेकार तरुणांनी काय करावे? असा प्रश्न भारतासमोर आहे. बेकारी हा एक सर्वभक्षक राक्षस आहे. व्यक्तींच्या गुणांचा, आशा-आकांक्षांचा, स्वप्नांचा आणि भावी जीवनाचा घास घेणारा क्रूर राक्षस आहे. बेकारीमुळे राष्ट्राचे तारुण्य सुकून जाते. ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर जीवनरुपी आकाशात उड्डाण करण्यासाठी पंख कापून सोडले जाते. बेकारीमुळे पंख कापलेल्या पाखरासारखा दीनवाणा झालेला तरुण कोणते पराक्रम करणार, कोणते साहस करणार, कोणती कर्तव्ये पार पाडणार?

बेकारीमुळे काय करावे आणि काय करु नये. अशा परिस्थितीत असताना तरुण व्यसनाकडे वळतो, त्याची मानसिकता बिघडते, तो खचून जातो, त्याची गरिबी त्याला सतावते. मित्रहो, मोठ्या व्यक्तींचे अनुकरण लहान मुले करत असतात. म्हणून तरुणांनी खचून न जाता आपल्या थोर नेत्यांचा आदर्श जपला पाहिजे, आपली हिम्मत कायम ठेवली पाहिजे.

"हिम्मत बुलंद है हमारी, पत्थर की जान रखते है,
पैरोंतले जमीं तो क्या, हम आसमाँ भी रखते है॥"

असे म्हणणाऱ्या युवकांची भारताला गरज आहे. टीचभर पोटाच्या खळगीसाठी शेतामध्ये राबणाऱ्या त्या मायबापाला हे माहित नसतं की शाळेत जाणारा माझा मुलगा खिशात रत्ना, बाबा, माणिकचंद, गोवा, बिडी, सिगारेट यांच्या पुड्या आणि पाकिटे ठेवतो. हे सर्व त्याच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक आहे. ही बाब लक्षात घेऊन हे व्यसन टाळण्याचे आव्हान आजच्या तरुणांनी स्वीकारावं आणि 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार' असे म्हणणाऱ्या बापूजी साळुंखे यांचं स्वप्न पूर्ण करावं.

अंधश्रद्धा आणि निरक्षरता हे आजच्या युवकांपुढील आव्हान आहे. आपल्या भारतात अंधश्रद्धा आणि निरक्षरता फार मोठ्या प्रमाणावर आहे. अंधश्रद्धेसाठी लोक नको ते करायला तयार होतात. आजच्या समाजात स्त्रीला तुच्छ लेखतात. त्यांच्यावर अन्याय होत आहे. त्या स्त्रियांनी कसं जगायचं हा प्रश्न आजच्या तरुणींना केला आहे. ती म्हणते,

"सांगा कसं जगायचं, कण्हत-कण्हत की गाणं म्हणत
वाटेवरती फुलं वेचत की, काट्यावरती दुःख झेलत"

आजची परकीय फॅशन देखील युवा पिढी पुढील आव्हान आहे. फॅशन म्हणजे तरी काय, फॅशन म्हणजे चालू वर्तन प्रकार होय. फॅशन कशासाठी करायची तर आपलं रुप सुंदर दिसावे. पाहणाऱ्यांसाठी मोहक व आकर्षक वाटावे. निसर्गाकडून आपल्याला मर्यादित सुंदरता लाभलेली आहे. पण स्त्रीने आपली मर्यादा ओलांडून फॅशन केली तर त्याचा उलट परिणाम दिसून येतो. रेखीव आणि रंगतदार कपड्यांनी शरीर आकर्षक करुन दाखवण्यासाठी आजची तरुण युवती जीन्स पॅन्ट, टी शर्ट अशा प्रकारचे परदेशी कपडे घालून मिरवत आहे. पण भारतीय फॅशनमध्ये स्त्री जेवढी

शोभून दिसते, तेवढी अन्य कुठल्याही फॅशनमध्ये दिसत नाही. म्हणून तिला सांगावसं वाटतं

"तुझ्या भारतीय वेषात जी सादगी आहे,
ती टी-शर्ट घालण्यात नाही
तू तशीच रहा, बदलून चालणार नाही..."

एकीकडे दहशतवाद, बेकारी, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा आहे तर दुसरीकडे भारताची लोकसंख्या भरपूर प्रमाणात वाढत आहे. या लोकसंख्येमुळे तरुणांची प्रगती होत आहे. लोकांना राहण्यासाठी जमीन अपुरी पडत आहे. गरिबी वाढत आहे, प्रदूषण वाढत आहे. 'मुले म्हणजे देवाघरची फुले' असं म्हणून पाहिजे तेवढी होऊ द्या, असं म्हणतात. त्यामुळे लोकसंख्या एक समस्या होऊन बसली आहे. आपले पूर्वज सांगून गेले की, तुम्ही लोकसंख्येला आळा घातला पाहिजे. देशाच्या सीमेवर उभे राहणाऱ्या सैनिकाला शरीरसंपत्तीचे महत्व विचारा. लोकसंख्येमुळे आरोग्याच्या सुखसुविधा मिळत नाही. देशाला आपली गरज कधी भासेल सांगता येत नाही आणि असंही म्हणतात की, या जगामध्ये अशक्य काहीच नाही म्हणून सांगावसं वाटतं की,

"मौत का बेहरम, इतिहास बदल सकता है ।
पाप का पुण्य में, विश्वास बदल सकता है ।
अगर अपने बाहो पर विश्वास हो तो,
यह तो धरती है, आंसमाँ भी बदल सकता है।"

मित्रहो, पर्यावरण संवर्धन देखील एक आव्हान होऊन बसले आहे. पर्यावरणाचा समतोल ढासळला तर मानवजात नष्ट होईल. यासाठी आपण निसर्गाशी मैत्री केली पाहिजे. पशू-पक्षी यांच्यावर प्रेम केले पाहिजे. नव-नवी झाडे लावली पाहिजेत, व पर्यावरणाचे संवर्धन केले पाहिजे. यासाठी आपण अशी प्रतिज्ञा करुया की,

"वृक्ष मी तोडंणार नाही, जमीन उजाड करणार नाही,
नवी नवी रोपं लावीन, हरितक्रांती घडवून आणीन"

मित्रहो, ही सर्व आव्हाने पेलण्यासाठी आजचा तरुण खडबडून जागा झाला पाहिजे. म्हणून मला या तरुणांना एक संदेश द्यावासा वाटतो की,

"उठ तरुणा, जागा हो, गरज आहे काळाची
"



# आई थोर तुझे उपकार

..... अजित रघुनाथ पाटील (बी.एस्सी.भाग-२)

तुझे उपकार आई ध्यानात येती
ध्यानात येती आई ध्यानात येती
तुझे उपकार ध्यानात येती ॥

त्रास सोशिला तू आई नऊ महिन्यांचा
पाळणा केला तू हाताचा
दिप केला तू आई नयनाचा

आईला छळता मूर्ख म्हणावे
आईविना जीवन व्यर्थ जगावे
तुझी मुर्ती कोरुनी आई हृदयी बसवावी

आईच्या नावाला उपमा कशाची
आईपुढे किंमत शून्य जगाची
तुझ्यासाठी आई हा देह विसरावा

# पैसा

✍..... समिता चंद्रकांत नौकुडकर (बी.कॉम.भाग-३)

होय, मीच तो ! तुमचं आयुष्य कसं जावं हे ठरवणारा, तुम्ही काय खावं, काय प्यावं आणि काय ल्यावं हे ठरवणारा. फक्त तुम्हीच नाही तर संपूर्ण जगानं कसं जगावं हे ठरवणारा. मी प्रसन्न तर सगळं जग तुमच्या मुठीत असेल आणि मी जर का तुमच्याकडे पाठ फिरवली तर जग तुमच्या छाताडावर नाचेल, तुम्हाला जीणं नकोसं करेल. मी कोणी देव नाही की कोणती अमानवी शक्ती नाही. तसं पहायला गेलं तर मी आहे एक कागदाचा कपटा, धातूचा तुकडा, असा तुकडा ज्यानं आजवर उभ्या आयुष्यात कधी केराची टोपली पाहिली नाही

''ना बीबी ना बच्चा, ना बाप बडा ना भैया,
the whole thing is that रे भैया
सबसे बडा रुपैया।''

यदा कदाचित पैसा बोलू लागला तर नक्की असाच असेल त्याचा अर्विभाव नाही का? यात गैर तरी काय आहे म्हणा. नाहीतरी आज हे जग पैशाच्याच तालावर नाचतंय ना. तुम्हाला माहिती असेल हा पैसा अस्तित्वात येण्याआधी वस्तू विनिमय पद्धत म्हणजेच 'Barter System' व्यवहारात होती तेव्हा अगदी बायकांच्या बदल्यात उंट असे सुद्धा सौदे व्हायचे पण नंतर नंतर त्यातील अपूर्णतः जाणवायला लागली. म्हणजे समजा की, पाच पोती गहू एका गायीच्या मोबदल्यात मिळतात आणि तुम्हाला जर एकच पोतं गहू घ्यायचं असेल तर गाईचा पाचवा हिस्सा मोबदला म्हणून कसा देणार? म्हणून नंतरच्या काळात साधारणतः इ.सन पूर्व ८०० वर्षापूर्वी चलन ही संकल्पना अस्तित्वात आली.



पण अगदी अल्पावधीतच लोकप्रिय झाली. लोकप्रिय झाली म्हणण्यापेक्षा लोकांना ती करुन घ्यावीच लागली. कारण, शेवटी 'दाम करी काम' म्हणतात ते काही खोटं नाही. त्यावेळचे चलन हे धातू, दगड इ. पासून बनवलेलं असायचं. पण पहिलं कागदी चलन इ.सन ६ व्या शतकात चीनमध्ये तयार केलं गेलं. ते निर्माण करणाऱ्या राजावर त्याच्या काही मंत्र्यांनी टिकाही केली की, काय हा चिटोरा, कोण हे जपणार? वगैरे वगैरे. पण त्यावर त्या राजाने सडेतोड उत्तर आपल्या मंत्र्यांना दिलं.

एकदा ते चलन अस्तित्वात आल्यानंतर त्या टिकाकारांना घेऊन तो राजा गच्चीत गेला आणि बऱ्याच कागदी नोटा खाली रस्त्यावर टाकल्या. त्या नोटा जसजशा खाली येऊ लागल्या, 'काय विचारता माणसांची गर्दी, तुटून पडली हो त्यावर,' असा हा पैशाचा महिमा.

कालांतराने हा पैसा इतका महत्वाचा झाला की लोक पैसा खावू लागले. अतिशयोक्ती नाही पण माणसाने शब्दशः

पैसा खाल्ला आहे. जेव्हा काही देशात चामड्याची नाणी तयार केली जात असायची तेव्हा एकदा पडलेल्या भीषण दुष्काळात पोटाची आग विझवण्यासाठी ती चामड्याची नाणी लोकांनी खाल्ली असं इतिहास सांगतो. आणि तो वारसा भिन्न भिन्न प्रकारे जपला नाही तर तो 'माणूस' कसला. फक्त हल्ली या सभ्यतेच्या युगात या पैसा खाण्याला अगदी गुळगुळीत नावं दिली आहेत. चहापाणी, हफ्ता, प्रेमाची भेट, टेबला खालचे व्यवहार नी काय काय.

माणसं पैसा खातात असं मी म्हणाले खरं पण काय बिशाद आहे माणसाची पैसा खायची? पैसा आता एवढा मोठा झालाय की त्यानंच माणसाला खाऊन टाकलय. पर्यायच नाही माणसाकडे दुसरा. पैसा हा मिळवावाच लागतो. पैशाची किंमत न जाणणारा या जगात दोनच नावांनी ओळखला जातो. एक तर बेजबाबदार नाहीतर विरक्त.

मला एक सांगा. या पैशाला इतका मोठा केला कुणी. माणसानेच की, तेही का माहिती आहे, भीतीमुळे! होय. भीतीमुळे. भीती, या वितभर पोटाची. भीती, आपल्या कौटुंबिक जबाबदारीची. भीती, मृत्युची आणि या समाजाची. पोटाची भूक भागवायची आहे, टाक पैसा. पोराबाळांना वाढवायचं आहे, टाक पैसा. आजारातून मुक्त व्हायचं आहे, टाक पैसा. इथे पैसा तिथे पैसा जिकडे तिकडे पैसाच पैसा करत वणवणं करतो. पै-पै जोडत साठवत राहतो आणि एक दिवस तो साठवलेला सगळाच पैसा सोडून एकटाच निघून जातो. कळतंय पण वळत नाही, दिसतंय पण पैशाची गुलामी सोडवत नाही.

पैशाला एकदा मोठं म्हणलं नी मानलं की मग आयुष्यभर तसंच वागावं लागतं. कारण, पैसा असेल तर समाजात प्रतिष्ठा. जेवढा पैसा मोठा तेवढी प्रतिष्ठा मोठी. आता प्रतिष्ठा पाहिजे मग नुसतं पैसाच असून चालत नाही. तशी अत्याधुनिक उच्च राहणी पाहिजे. मग त्यासाठी नवनवीन वस्तू, नवनवीन उत्पादने हवीत म्हणजे मागणी वाढली. मागणी वाढली की पुरवठ्यात वाढ व्हायलाच हवी. त्यामुळे मग कारखाने, उद्योगधंदे उभारणं ही आलंच. त्यासाठी भांडवल लागणं क्रमप्राप्त. मग भांडवलदार पैशाला पैसाच जोडतो. हे तत्त्व अगदी ध्यानात ठेवून भांडवल घालणार नी मग पैसा ओढण्यासाठी मजुरांना पिळवटून काढणार. माणूस माणसाला पिळणार, माणूस माणसाचं शोषण करणार कारण, 'सबसे बडा रुपैय्या.'

सुखी सगळ्यांनाच व्हायचं असतं. मग सुख म्हणजे नेमकं काय? तर आजच्या समाजाच्या कल्पनेनुसार सुख म्हणजे स्वतःची घरं, गाड्या अत्याधुनिक वस्तू, कपडालत्ता, जडजवाहिरे वगैरे वगैरे. मग ज्यांच्याकडे हे आहे आणि ज्यांच्याकडे हे नाही त्यांच्यात फरक काय? दोघेही माणसंच. दोघेही काम करतात पण फरक फक्त एकच तो म्हणजे पैसा. त्यामुळे माणसाच्या डोक्यात एकच विचार बसतो सुख हवं असेल तर पैसा हा असलाच पाहिजे आणि तोही जास्तीत जास्त. मग या पैशाला प्रसन्न करण्यासाठी सुरु होतात अथक प्रयत्न. तो सरळ मार्गाने मिळत नाही म्हटल्यावर कशाकशाची आहुती दिली जाते. कष्टाची, आरोग्याची, नात्यांची, नीतीमूल्यांची आणि शेवटी माणुसकीचीही.

या पैशाच्या मोठेपणामुळे पडतात खून नी दरोडे, या पैशाच्याच मोठेपणामुळे म्हाताऱ्या आई-बापाची वाटू लागते अडगळ. या पैशापायीच तुटतो घरातला संवाद आणि उद्ध्वस्त होतात कितीतरी संसार, याच पैशाच्या मोहापायी लागतात माणसां-माणसांत झुंजी, या पैशाचच नादी लागून राज्यकर्ते करतात जनतेकडे दुर्लक्ष, भ्रष्टाचाराने देश सरा पोखरलाय. हा भ्रष्टाचार म्हणजे दुसरं काय? पैशाचा हव्यासव

ना. लालदिव्याच्या गाडीपासून ते साध्या हातगाडीवाल्यापर्यंत सर्वजण सर्रास भ्रष्टाचार करतात. हेच या पैशाच्या मोठेपणाचे परिणाम.

वितभर पोटासाठी माणूस झगडतो. हवं ते मिळू लागलं की आपली मूळची गरजच विसरतो. चैन ही गरज केव्हा बनून जाते समजतही नाही हो. आपला हाच का हो तो समाज जिथे 'अतिथि देवो भवः' असं म्हटलं जाई आणि मानलं ही जाई. खंडीभर पैशाला लाथाडूनही राष्ट्राशी इमान राखला जाई. तहानलेल्याला पाणी, भुकेलेल्याला विनामूल्य अन्न देण्यात पुण्य मानलं जाई. दोन वेळचं पुरेसं अन्न, ल्यायला पुरेसे कपडे, आश्रयाला छोटसं घरकुल मिळालं की पोराबाळात माणसाचं मन रमे. पण आजचा आपला हा समाज किती धावतोय आणि किती धावणारय अजून भविष्याच्या भविष्याची तरतूद करता करता टिचून-टिचून चाललाय माणूस. पूर्वी माणसासाठी पैसा होता. आता फक्त पैशासाठीच माणूस उरलाय का हो? 'माणसा रे माणसा कोण होतास तू काय झालास तू'

देव माणसाचा पिता देवच त्याची आई
जन्माला घालताना मात्र केली थोडी घाई
चालायला शिकवलं, पळायला शिकवलं
पण थांबायचं कुठं हे शिकवलंच नाही.
पळता-पळता दम खुंटला, अहो आयुष्य गेलं संपून
एक पडला, दुसरा खचला
तरी तिसरा धावतोयच की हो जीव तोडून
चैनीची पुटं चढलेला गरजेचा बोजा घेऊन
चालणाऱ्यांच्या वेदनांना काय तोटा
वेगाच्या वेगवान स्पर्धेत पैसा झाला मोठा
नी माणूस मात्र ठरला हो खोटा!

पैसा नाचवतोय नी माणूस नाचतोय. अरे आपला स्वतंत्र बाणा आणि स्वाभिमानी कणा गेला तरी कुठे? आयुष्यभर पैशाच्या मागे धावण्यापेक्षा थोडंसं मागे वळून पाहूया. आठवणीचं सुख अनुभवायला पैसा नाही लागत राव. लहानपणी मित्रांशी खेळून नवीकोरी कपडे खराब करण्याचा आनंद ब्रॅण्डेड वस्तूतून मिळणाऱ्या आनंदापेक्षा अधिक स्वस्त आणि मस्त होता ना.

दोस्त हो, आपलं उभं आयुष्य अजून समोर आहे ते पैशासाठी नको माणसांसाठी जगूयात ना.

आयुष्याच्या संध्याकाळी,
सुखामागे धावताना, सुख हुल देत गेलं
मला जगायचं जगायचं म्हणताना
जगायचंच राहून गेलं.

अशी म्हणण्याची वेळ तुमच्या आमच्यावर येऊ नये म्हणून एकच सदिच्छा करते, 'पैसा जरुर मोठा होवो, पण तुमच्या आमच्या पैक्षा नाही.'

# आकांक्षापुढती गगन ठेंगणे

✍..... आरती सखाराम कासारकर (बी.ए.भाग-३)

सुनिता विल्यम्स, स्वप्ने प्रत्यक्षात आणण्यासाठी नेटाने प्रयत्न करणाऱ्या आणि स्वप्नपूर्तीचा निखळ आनंद उपभोगणाऱ्या नव्या पिढीची प्रतिनिधी. आंतरराष्ट्रीय अवकाशस्थानकात सहा महिने राहणे हेच एक साहस असते. त्यासाठी विलक्षण मानसिक व शारीरिक बळ कमवावे लागते. सुनिताने ते प्रयत्नपूर्वक कमविले. ही साधनाही खडतर आणि धैर्याची कसोटी पाहणारी असते. अतिशय काटेकोर आणि शिस्तशीर जीवन अनेक वर्षे जगावे लागते. टोकाच्या शारीरिक व मानसिक कसोट्यांना तोंड द्यावे लागते, स्वप्ने पाहणे सोपे असते; पण स्वप्नपूर्तीची तपश्चर्या अतिशय अवघड असते. या अर्थाने सुनिता विल्यम्स 'सेलिब्रेटी' असते. केवळ भारतातल्याच नव्हे तर जगभरातल्या स्वप्ने पाहणाऱ्या असंख्य तरुण मुलांमुलींची ती रोल मॉडेल असते.

अंतराळात सर्वाधिक काळ रहाण्याचा विक्रम करणाऱ्या सुनिता विल्यम्सने अंतराळ सफरीचे स्वप्न वास्तवात आणले... खडतर, अथक प्रयत्नांनिशी... भारताशी तिचे आंतरिक नाते आहे. मूळचे अहमदाबादचे रहिवासी डॉ. दिपक पंड्या यांची ती कन्या. सुनिताचा जन्म १९ सप्टेंबरमध्ये १९६५ रोजी ओकिओतील युक्लिड इथे झाला.

तिची आजवरची वाटचाल खरोखरच थक्क करणारी आहे. लहानपणापासून खेळाची विलक्षण आवड असल्याने संधी मिळेल तिथे ती खेळात रममाण व्हायची. लहानपणी मनसोक्त खेळायला मिळणे, हे तंदुरुस्तीसाठी आवश्यक असते; तेवढेच ते आयुष्यात यशस्वी होण्यासाठीही आवश्यक असते. या वास्तवाची पुरेशी जाण असणाऱ्या आई-वडिलांनी सुनिताच्या स्वप्नांना भक्कम आधार दिला. विमानातून हवेत भरारी घेण्याची आकांक्षा असो, वा थेट समुद्राचा तळ गाठून तेथील प्राणीजीवनाचा अभ्यास करण्याची इच्छा असो. सुनिताने नेहमीच भव्य स्वप्ने पाहिली आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी अविरत प्रयत्न केले.

मॅसेच्युसेटसमधून सुनिताने शालेय शिक्षण पूर्ण केलं. अमेरिकेच्या नेव्हल ॲकॅडमीमधून तिने प्रथम फिजिकल सायन्स मध्ये पदवी घेतली. मग फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजितून अभियांत्रिकी व्यवस्थापनामध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. वयाच्या बाविसाव्य वर्षी सुनिता अमेरिकी नौदलात टेक्नॉलॉजीतून अभियांत्रिकी व्यवस्थापनामध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. वयाच्या बाविसाव्या वर्षी सुनिता अमेरिकी नौदलात 'इनसाईन' म्हणून दाखल झाली. त्यानंतर तिने मागे वळून पाहिलेच नाही. सहा महिने नेव्हल कोस्टल सिस्टम कमांडमध्ये काम केल्यानंतर तिला बेसिक ड्रायव्हिंग ऑफिसर हे पद मिळाले. नंतर ती नौदलाच्या हवाई तुकडीत दाखल झाली. नौदलाच्या वैमानिक प्रशिक्षण संस्थेत सुनिताने आपले वेगळेपण सिद्ध केले. स्क्वॉड्रन सेफ्टी ऑफिसर, नेव्हल टेस्ट पायलट स्कूलमध्ये रोटरी विंग डिपार्टमेंटमध्ये इन्स्ट्रक्टर, सेफ्टी ऑफिसर अशा अनेक जबाबदाऱ्या तिने यशस्वीपणे सांभाळल्या. आता तिला अमेरिकी नौदलात कॅप्टनचा हुद्दा आहे.

महत्वाच्या जबाबदाऱ्या आणि तीसहून अधिक वेगवेगळ्या बनावटींची विमाने चालविण्याचा ३००० तासांचा अनुभव घेऊन सुनिता जून १९९८ मध्ये नासा या जगप्रसिद्ध अमेरिकी अंतराळ संशोधन संस्थेत दाखल झाली.

९ डिसेंबर, २००६ हा दिवस सुनिताच्या आयुष्यातला महत्वाचा ठरला. डिस्कव्हरी या स्पेस शटलमधून सुनिताने आपला पहिला अंतराळ प्रवास केला. पुढच्या प्रवासात 'मी स्पेसशीपचा कंट्रोल घेतला आहे' हे तिचे शब्द त्यावेळी जगाच्या वेगवेगळ्या भागांतून सुनिताच्या क्रामगिरीकडे डोळे लावून बसलेल्या शास्त्रज्ञांना दिलासा देणारे ठरले. जगभरातल्या अंतराळ शास्त्रज्ञांनी तिच्या क्षमतांवर विश्वास टाकला होता. या विश्वासामागे होते सुनिताचे अथक परिश्रम.

अवकाशभरारीचे वेड असलेल्या सुनिता विल्यम्सने अवकाशात सर्वाधिक काळ चालून पेगी व्हिटसन यांचा विक्रम मोडला. तेव्हा त्यांनी 'अशीच पुढे जात रहा' अशा शब्दांत सुनिताचे अभिनंदन केले. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाच्या दुरुस्तीसाठी सुनिता आणि तिचा जपानी सहकारी अहिहिको होशिदे यांनी तब्बल सहा तास २८ मिनिटे 'स्पेस वॉक' केला. विशेष म्हणजे, पेगीने सहाव्या 'स्पेस वॉक' मध्ये विक्रम प्रस्थापित केला होता व सुनितानेही आपल्या सहाव्याच 'स्पेस वॉक' मध्ये तो मोडित काढला.

सुनिताच्या विक्रमाची मातब्बरी जेवढी आहे, तेवढीच तिच्यातली ही नम्रता वाखाणण्याजोगी आहे. एखाद्या व्यक्तीच्या यशाची खूण जशी पराक्रमात सापडते, तेवढीच ती यश किंवा अपयश पचविण्याच्या क्षमतेतही दिसते. अंतरांळ क्षेत्रातील आपल्या वाटचालीच्या प्रत्येक टप्प्यावर सुनिताने हे दाखवून दिले आहे. माघार घेण्याऐवजी प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्याचा आणि सातत्याने नव्या संकल्पनांचा विचार करा, असाच सल्ला ती आपल्या तरुण चाहत्यांना देते. आपला 'अवकाश' मिळविण्यासाठी आपल्या देशातील बहुतांश स्त्रियांना आजही प्रत्येक टप्प्यावर झगडावे लागते. त्यामुळेच अंतराळात भरारी घेणाऱ्या सुनिता विल्यम्सचे या 'अर्ध्या आकाशा'ला प्रेरित करण्याचे महत्व असाधारण आहे. त्यामागील झपाटलेपण अनेकांच्या मनात नव्या प्रेरणा रुजवेल म्हणूनच तिच्या विक्रमाचे मोल मोठे आहे.



# इंदिरा गांधी

✍..... भाग्यश्री शिवाजीराव देसाई (बी.एस्सी.भाग-२)

इंदिरा गांधी यांचा जन्म हा एका थोर घराण्यामध्ये १९१७ साली झाला. या देशाला स्वातंत्र्य मिळूवन देण्यासाठी ज्यांनी आपले सर्वस्व पणाला लावले अशा थोर विभूतींमध्ये पंडित जवाहरलाल नेहरु हे एक होते. बालवयामध्ये इंदिरांच्यावर पंडीत नेहरुंचे अतिशय उत्तम प्रकारचे संस्कार झाले. त्या जन्माला आल्यानंतर घरची परिस्थिती अतिशय श्रीमंतीची असताना देखील त्या परिस्थितीचा उपभोग त्यांना घेता आला नाही. जवाहरलाल नेहरुंना वारंवार होणाऱ्या तुरुंगवासामुळे बालवयात त्यांना पुरेसा वडिलांचा सहवास लाभला नाही.



ज्या बालवयात भातुकलीचे खेळ खेळायला हवे होते, मौजमजा करायला हवी होती त्या वयात त्यांना स्वातंत्र्यप्रेमाचे धडे शिकायला मिळाले. तुरुंगवास असताना नेहरुजींनी छोट्या इंदिरेला लिहिलेली पत्रे वाचण्यासारखी असत. त्यातूनच त्यांना देशभक्तीची आवड निर्माण झाली. या भातरमातेला स्वतंत्र करण्यासाठी ज्या ज्या वीरांनी जो जो त्याग केला, आपले सर्वस्व पणाला लावले अशा थोर देशभक्तांचा ठसा लहाणपणीच त्यांच्या मनात रुजला गेला. देशप्रेमाने नेहमी नेहरूंचे मन भारावून जायचे. त्या काळात देश स्वतंत्र करण्यासाठी जे जहाल मतवादी नेते होऊन गेले त्यामध्ये सुभाषचंद्र बोस, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव, वासुदेव बळवंत फडके इत्यादी वीरांची मोठी नामावली पहायला मिळते. या सर्व देशभक्तांचा इंदिराजींच्या व्यक्तीमत्वावर प्रभाव पडला होता. पण याहीपेक्षा अधिक प्रभाव पडला होता तो म्हणजे अहिंसेच्या मार्गाने या देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या, सत्य, अहिंसा, स्वावलंबन यांचा पुरस्कार करणाऱ्या पितामह महात्मा गांधी यांचा.

इंदिराजींना बालवयामध्येच महात्मा गाधींचा सहवास लाभला. त्यांचे पिता जवाहरलालजी यांचे समवेत, तसेच महात्मा गांधी यांच्याबरोबर त्यांनी अनेक चळवळीमध्ये हिरीरीने भाग घेतला. किशोरवयातच दांडी यात्रा, मिठाचा सत्याग्रह यासारख्या अनेक आंदोलनामध्ये त्यांनी शेकडो मैलांचा प्रवास करुन भाग घेतला. देशाभिमान काय असतो व त्यासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करुन प्रसंगी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून आपली भारतमाता स्वतंत्र करण्यासाठी अनेक देशवासीयांनी आपल्या जीवनाची कशी होळी केली ते त्यांनी जवळून पाहिले त्यामुळे घरची परिस्थिती श्रीमंतीची असताना देखील सर्व भौतिक सुखांचा त्याग करुन आपल्या कमीतकमी गरजा ठेऊन, एका तपस्व्याचे जीवन जगण्याचा मंत्र त्यांना महात्मा गांधी यांच्या सहवासाने लाभला. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली या देशामध्ये अनेक आंदोलने करण्यात आली त्यामध्ये असहकाराची चळवळ, परदेशी मालावर बहिष्कार, स्वदेशीचा मूलमंत्र इत्यादी आंदोलने या देशातील लाखो लोकांनी केली आणि नाईलाजाने या देशाला ब्रिटीशांना स्वातंत्र्य द्यावे लागले आणि या सर्व चळवळींमध्ये चिमुकल्या इंदिरा गांधींनी सहभाग घेतला होता.

भारत देश हा विभिन्न जाती, धर्म व प्रातांनी विभागला आहे. या देशाची घटना स्वातंत्र्य, समता, बंधुता असून या देशामध्ये प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे, रीतीरिवाजाप्रमाणे वागण्याचा, जगण्याचा अधिकार आहे. 'विविधतेमध्ये एकता' हे आपल्या देशाचे वेगळेपण आहे. कै. पंडीत जवाहरलाल नेहरु या देशाचे पहिले पंतप्रधान झाले. त्यांनी अल्पावधीमध्येच या देशाला प्रगतीपथावर

नेण्यासाठी, लोकशाहीचा पाया भक्कम करण्यासाठी अथक प्रयत्न केले, मोठ्या धरणांच्या माध्यमातून या देशातील जास्तीतजास्त जमीन ओलिताखाली आणण्यासाठी भाक्रा नानगलसारखे प्रकल्प उभे केले. या देशामध्ये हरितक्रांती झाली व अन्नधान्याच्या बाबतीत हा देश स्वयंपूर्ण बनला.द या देशाची औद्योगिक प्रगती करण्यासाठी मोठमोठे औद्योगिक प्रकल्प देशामध्ये सार्वजनिक क्षेत्रांमध्ये विकसित केले. पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून कृषी, औद्योगिक व व्यापार या सर्व क्षेत्रांमध्ये आमूलाग्र अशी प्रगती करण्यात आली व आपला देश सर्व बाबतीत संपन्न व सक्षम झाला.

कै. पंडीत नेहरु यांचे अल्पशा आजाराने निधन झालेनंतर या देशाचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री झाले, ते एक प्रखर गांधीवादी, गांधीभक्त होते. त्यांनी अल्पावधीमध्येच या देशाचा कार्यभार उत्तम प्रकारे सांभाळला त्यांच्यानंतर इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान झाल्या. अफाट कर्तृत्व व प्रगल्भ अशी विचारसरणी असणाऱ्या इंदिरा गांधी यांनी या देशाची सूत्रे हाती घेतल्यानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये देखील भारताची मान मानाने उंचावीत अशाप्रकारे कारभार सांभाळला. प्रचंड लोकप्रियता असणाऱ्या इंदिरा गांधी यांनी या देशाची नारीशक्ती एकवटवून प्रशासनामध्ये स्त्रियांचा सहभाग वाढवला. प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रियांचे आगमन झाले व प्रगतीच्या दृष्टीने पुरुषांच्या तुलनेत स्त्री ही कुठेच कमी नसून राजकीय, सामाजिक व इतर क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून ती काम करु शकते हे त्यांनी सत्तेत आल्यानंतर घेतलेल्या धाडसी निर्णयाने सिद्ध करुन दाखविले. वारंवार कुरघड्या करणाऱ्या पाकिस्तानला, बांगलादेशला स्वतंत्र करुन पाकिस्तानचे कायमचे कंबरडे मोडले. देशाच्या विकासामध्ये अर्थकारण हा महत्वाचा भाग असून तो एकसूत्री असावा यासाठी बँकांचे राष्ट्रीयकरण करण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. खऱ्या अर्थाने स्त्रियांना व त्याचबरोबर या देशातील गरीब जनतेला प्रगती पथावर नेण्यासाठी स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी अनेक धाडसी निर्णय त्यांनी त्यांच्या काळात घेतले. भारत-पाकिस्तान युद्धानंतर त्या काळातील विरोधी पक्षात असणारे व नंतर या देशाचे पंतप्रधान झालेले अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांना दुर्गेची उपमा दिली होती.

या देशामध्ये किंबहुना अखंड विश्वामध्ये ज्या काही कर्तृत्ववान स्त्रिया होवून गेल्या त्यामध्ये झाशीची राणी, चांदबिबी, सावित्रीबाई फुले, जिजामाता, मदर तेरेसा व अलिकडच्या काळातील सोनिया गांधी, किरण बेदी, मेरी कोम इत्यादी कर्तृत्ववान स्त्रियांमध्ये इंदिरा गांधी यांचे नाव इतिहासामध्ये अग्रक्रमाने घ्यावे लागेल. तरी अलिकडच्या काळातील स्त्रियांनी इंदिरा गांधी यांचा आदर्श ठेवावा. स्त्री ही केवळ अबला नसून ती तिच्या प्रखर अशा कर्तृत्वाने कुठल्याही क्षेत्रामध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकते, तसेच पुरुषांपेक्षा स्त्री ही कुठेच कमी नसून ती एक उमदी, जगाला हादरा बसवणारी राजकीय क्षेत्रातील उत्तुंग व्यक्तीमत्व बनू शकते, तसेच शिक्षण क्षेत्रामध्ये, सामाजिक व इतर क्षेत्रामध्ये ती पण उत्तुंग असे व्यक्तिमत्व साकारु शकते हे इंदिरा गांधी यांच्याकडे पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येते.

इंदिरा गांधी या उच्चशिक्षित होत्या त्यामुळे संसदेमध्ये त्याकाळी ३२ विरोधी पक्षामध्ये असणाऱ्या चांगल्या संसदपटूंची भाषणे त्या मन लावून ऐकत. देशाचा राज्यकारभार करत असताना केवळ विरोधासाठी विरोध न करता राजकीय व सामाजिक क्षेत्रामध्ये त्यांच्या विरोधामध्ये काम करणाऱ्या विद्वान अशा व्यक्तींचा पण त्यांनी मानसन्मान ठेवला व प्रसंगी या देशाची प्रगती करण्याच्या भावनेने ज्या ठिकाणी त्यांचे सहकार्य आवश्यक होते ते त्यांनी जरुर घेतले. विरोधी पक्षात असणाऱ्या अनेक अभ्यासू व्यक्तींना त्या पंतप्रधान असताना परदेश दौऱ्यामध्ये इतर देशातील चांगल्या गोष्टींचा, बाबींचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी परदेशात देखील पाठविले व त्याचा फायदा आपल्या देशातील नागरिकांना कसा मिळेल याची दखल घेतली. त्यांच्या काळात अंतराळ संशोधन करण्यासाठी अंतराळ मोहिम आखून त्याचे यशस्वी प्रक्षेपण केले व त्याचा फायदा सॅटेलाईटच्या माध्यमातून नवीननवीन गोष्टी संशोधनातून उपलब्ध करुन या देशाला मिळवून दिल्या.

१९६२ साली चीनबरोबर झालेले युद्ध व त्यामध्ये

आपल्या देशाला पत्करावी लागलेली हार पंडीत नेहरुंच्या मनाला खोल जखम करुन गेली पण इंदिरा गांधींनी ती बाब दुर्लक्षित केली नाही. आपल्या देशाचे संरक्षण करण्यासाठी लागणारी आधुनिक तंत्रज्ञाने त्यांनी विकसित केली, आधुनिक तंत्रज्ञानाचे रणगाडे, आधुनिक क्षेपणास्त्रे, लढाऊ विमाने, लढाऊ पाणबुड्या इत्यादींचा विकास करुन ती भारताच्या संरक्षण क्षेत्रामध्ये उपलब्ध करुन दिली. या देशातील जे काही ताकदवान देश होते त्यांच्या विरोधाला न जुमानता आपल्या देशामध्ये अणुशक्ती संशोधन 'भाभा अणुसंधान' यासारख्या संशोधनामधून स्वतःच्या संरक्षण सिद्धतेसाठी अणूबॉंब निर्मिती केली व त्याचे यशस्वी प्रक्षेपण वाळवंटामध्ये घडवून आणले. पंडीत नेहरुंच्या काळामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समवेत जी घटना लिहिण्यात आली त्या घटनेच्या चौकटीमध्ये राहून त्याची पायमल्ली होणार नाही याची खरबदारी घेतली.

जगाच्या पाठीवर लोकसंख्येच्या तुलनेत आपल्या देशाचा नंबर दुसरा लागतो असे असताना लोकशाहीच्या माध्यमातून संस्कार चालविणारा भारत देश हे एकमेव राष्ट्र आहे. लोकशाहीच्या माध्यमातून १३० कोटी लोकसंख्या असणारा देश एकत्र ठेवणे हे फार मोठे जिकरीचे काम असताना देखील त्यांनी हा इंद्रधनुष्य पेलून जगासमोर एक आदर्श घालून दिला.

या देशाची लोकसंख्या ज्या झपाट्याने वाढत होती त्याला प्रतिबंध करण्यासाठी कुटुंबनियोजनासारखी योजना सक्षमपणे राबविण्यात आली. स्त्रियांचा राजकीय, सामाजिक क्षेत्रात शिरकाव व्हावा यासाठी पंचायत समिती, जिल्हापरिषद तसेच विधानसभा, लोकसभा याठिकाणी स्त्रियांचा सहभाग वाढावा यासाठी स्त्रियांसाठी ३०% मतदार संघ राखीव केले. या देशातली गोरगरीब समाजातील मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून मुलांसाठी तसेच मुलींसाठी मोफत शिक्षणाची व्यवस्था केली. वेगवेगळ्या मागासवर्गीय व भटक्या विमुक्त जाती-जमातीतील गोरगरीब तसेच दारिद्र्यरेषेखाली वावरणाऱ्या समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत विकासाची गंगा पोहोचावी म्हणून त्यांनी अनेक प्रकल्प राबविले. त्यामध्ये संजय गांधी निराधार योजना, बेघर व गोरगरीब लोकांना मोफत घरबांधनी योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी, विधवांसाठी पेन्शन योजना इत्यादी अनेक प्रकल्प त्यांनी राबविले. विविध जातीधर्मांमध्ये, प्रांतांमध्ये एक संघटना व्हावी यासाठी भाषावार प्रांतरचना करुन त्या त्या राज्याच्या सीमा ठरवून त्यांचे वेगळेपण जोपासले. अशाप्रकारे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आपला देश सुदृढ बनविण्यासाठी व प्रगतीपथावर नेण्यासाठी इंदिरा गांधींनी अहोरात्र मेहनत घेतली.

या देशाची जातीधर्माच्या माध्यमातून कुठल्याही प्रकारे विभागणी होणार नाही याची त्यांनी दखल घेऊन पंजाबमधील 'बिंदरनवाचे' यासारख्या अतिरेकी शक्ती वाढू नयेत म्हणून व कुठल्याही समाजाच्या भावना न दुखावता सुवर्णमंदिरासारख्या पवित्र ठिकाणी प्रसंगी सैनिक घुसवून त्यांचा बिमोड करण्याचे काम केले. मुलतः कोमल असणाऱ्या इंदिरा गांधी या प्रसंगी केवढ्या वज्राहूनही कठीण होत्या हे त्यांनी जगाला दाखवून दिले. त्या जिवंत असेपर्यंत या देशामध्ये कुठल्याही अंतर्गत कारवाया किंवा अतिरेकी हल्ले झाले नाहीत. किंबहूना पर्यटकांनी आपल्या देशाकडे वाकड्या नजरेनी पाहण्याची हिंमतदेखील केली नाही व ज्यांनी करण्याचा प्रयत्न केला त्यांनी त्यांनी आपल्या वागण्यातून सडेतोड उत्तर देऊन त्यांचा निःपात केला. अशाप्रकारे त्यांनी आपले संपूर्ण जीवन देशासाठी समर्पित केले व त्यांचा शेवट विश्वासघाताने समाजातील घातकी प्रवृत्तींच्या लोकांकडून करण्यात आला. पण अशा प्रकारच्या प्रवृत्तींना पाठीशी न घालता त्यांनी आपल्या देशासाठी वीरमरण पत्करले. त्यांचा तो त्याग हा देश कधीच विसरणार नाही.

# बाबा आमटे

✍..... धनश्री अरविंद देसाई (बी.एस्सी.भाग-२)

मुरलीधर देविदास आमटे म्हणजेच ख्यातनाम समाजसेवक बाबा आमटे. यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे २८ डिसेंबर १९१४ रोजी झाला.

दुसऱ्याच्या दुःखात दुःखी होणं आणि त्या परिस्थितीत आपल्याजवळ जे जे आहे ते दुसऱ्याला देऊन टाकणं अशा प्रकारची सक्रिय सहानुभूती बाबांच्यात होती. दिवाळीत फटाक्यासाठी पैसे मिळाले ते घेऊन बाबा बाजारात गेले. फटाक्याच्या दुकानाशेजारी एक आंधळा भीक मागत होता. त्याचं दर्शन होताक्षणीच फटाक्यांसाठी नेलेले पैसे त्याच्या वाडग्यात बाबांनी टाकले. फटाके कशाला? क्षणार्धात त्याची राख होणार म्हणजे पैशाची राख होणार. त्यापेक्षा आंधळ्याच्या पोटात आपल्या पैशांनी काही जाईल तरी असा विचार करणारे बाबा.

बाबांचं प्राथमिक शिक्षण बडोद्यात झालं. सुटीच्या दिवसात रानावनात भटकंतीचा छंद. त्यातून आदिवासी जीवन व माणसं याबद्दल विलक्षण आपुलकी वाटू लागली. त्याच काळात पुढे भसरागडला जाऊन आल्यावर 'या भूमीसाठी मी काहीतरी करीनच' असा निर्धार करुनच परतले. हेमलकसाच्या 'लोक बिरादरी' या त्यांच्या प्रकल्पांचा उगम माडियांबद्दलच्या सहानुभूतीतच आहे. बाबांचं हायस्कूल व कॉलेजचं शिक्षण तिथंच नागपूर येथे झाले. शाळेत जाताना घोडागाडी आली. कॉलेजला जाताना मोटारगाडी आली. उंची कपडे आले. बाहेर खाण्यापिण्यासाठी खिशात भरपूर पैसे असत; पण बाबांना अभ्यासापेक्षा अभ्यासेतर विषयात आणि उद्योगात त्यांचे जास्त लक्ष असे. नवे छंद तयार झाले, शिकार करणे, मैफिलीला हजेरी, चित्रपटांची आवड व तीन तीन वेळा एखादा चित्रपट पाहिला जाई.

बाबा मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांची इच्छा होती डॉक्टर होण्याची, त्या दृष्टीने त्यांचे कॉलेजचे प्रवेशाचे बेत चालले होते. पण वडिलांची इच्छा बाबांनी वकील व्हावे अशी होती. वडिलांच्या इच्छेविरुद्ध काही करणं शक्यच नव्हतं. म्हणून १९३४ मध्ये त्यांनी बी.ए. ची पदवी मिळवली आणि लगेच सरकारी विधी महाविद्यालयात प्रवेध घेतला. १९३६ साली त्यांना कायद्याची पदवी मिळाली आणि बाबा वकील झाले.

बरोड्यात वकिली सुरु केली. मात्र झाडूवाले, भंगी, विणकर यांच्या संघटना बांधण्यास सुरवात केली. वंचितांच्या उपेक्षितांच्या संघटना बांधल्याशिवाय त्यांना आपले हक्क मिळवता येणार नाहीत या हेतूने त्यांनी हे काम सुरु केले. मात्र वकिलीत मन रमत नव्हते हे तितकेच खरे.

बाबांनी वकिली सोडली. वडिलोपार्जित इस्टेटीवर पाणी सोडले. मात्र ते म्युनिसिपॉलिटीतील कामात सक्रिय झाले. ते तिथे उपाध्यक्षपद भूषवित होते. भंगी कामगार युनियनचेही ते अध्यक्ष होते. एकदा भंग्यांनी सेवाशर्थीतील सुधारणा हा वेतनवाढीसाठी संप पुकारला. तेव्हा बाबांनी त्यांच्याशी बोलणी केली. चर्चेच्या वेळी संपकरी त्यांना म्हणाले, 'आम्हाला दररोज जे घाणेरडं काम करावं लागतं ते तुम्ही करु शकाल काय? पाऊस पडत असताना डोक्यावरुन मैला वाहून नेल्यावरच तुम्हाला आमचं काम कसं असतं ते कळू शकेल.' बाबांनी ते आव्हान स्वीकारलं आणि भंगीकाम करण्यास पुरेसा वेळ देता यावा म्हणून ते पहाटे ३ वाजता उठून ४ वाजल्यापासून ८ वाजेपर्यंत गावातील संडास साफ करण्याचे म्हणजे मैला वाहून नेण्याचे काम करीत तेही अनुभवाच्या तळमळीतून. एक नाक, कान, सडून गेलेला तुळशीराम नावाचा कुष्ठरोगी गटारात पडलेला त्यांच्या दृष्टीस पडला. काही दिवसाच्या आत्मचिंतनातून तुळशीरामाच्या रुपानं त्यांच्यापुढे त्यांचं जीवित कार्य स्पष्टपणे उभं राहिलं. रस्त्यात पडलेल्या महारोग्याचे दर्शन आणि तोच त्यांच्या जीवनातला साक्षात्काराचा क्षण होता. त्यांच्या खळखळत्या जीवनप्रवाहाला एक नवं वळण, नवी दिशा मिळाली. जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणण्याचा

त्यांनी क्षण पकडला. कुष्ठरोगाविषयी भीती नाहीशी करण्याचं आणि कुष्ठरोग्याला त्याचा हरवलेला आत्मविश्वास, विसरलेला मानसन्मान आणि त्याला दर्शन झालेलं त्याचं आत्मसामर्थ्य परत मिळवून द्यायचं त्यांनी ठरवलं.

